म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८९

ककवी जगदीश जाधव

यांचा काव्यसंग्रह

# मानाचा मुजरा



REFBK-0025713
REFBK-0025713

: संपादक :

– गंगाधर तु. जाधव

– वि. ध. लोटेकर

संदर्भ काव्य
२५८१
२५७१३
२गा८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८१
२५७१३
काव्य २गा८८
संदर्भ शाखा

## लोककवी जगदीश जाधव
यांचा काव्यसंग्रह

# मानाचा मुजरा

REFBK-0025713
REFBK-0025713

आयुष्यभर काबाडकष्ट करून आपल्या
मुलाचे जीवन जिने घडविले त्या कवी जगदीशांच्या
मातोश्री श्रीमती द्रौपदीबाई हरिभाऊ जाधव
यांच्या चरणी अर्पण...!

– संपादक

प्रकाशक :
मनोविकास प्रकाशन,
अरविंद घनःश्याम पाटकर,
आमदार निवास, मंत्रालय,
मुंबई.

●

© श्रीमती सुमति तु. जाधव
१३/२९, बी. आय. टी. चाळ.
ताडवाडी, माझगांव मुं. १०

●

मुखपृष्ठ :
श्री. अशोक रोकडे

●

प्रथमावृत्ती :
डिसेंबर १९८७

●

किंमत रु. १०

●

मुद्रक :
स्टार प्रिंटर्स
गुर्जरवाडी, बाजारपेठ
अलिबाग–रायगड

# दोन शब्द

भावनांनी भारलेलं मन जेव्हा शब्दरूप घेतं आणि कवितेच्या कोमल कुंजातून उमलून येतं तेव्हा कवीचं अंतर्याम मोकळं झालेलं दिसतं. लोककवी जगदीश जाधव यांच्या मनोभावना अशाच शब्दरूप झालेल्या 'मानाचा मुजरा' या काव्यसंग्रहात वाचावयास मिळतात. देशभक्ती आणि इतर भावकविता तशीच लोकगीते आणि धार्मिक गीते लिहिताना कवीचं मन उचंबळून आलेलं दिसतं. प्रत्येक कवितेत त्यांचा मनमोकळेपणा विशेषत्वाने जाणवतो. लोककवी जगदीश जाधव यांचे सुपुत्र श्री. गंगाधर जाधव आणि विचारवंत श्री. वि. ध. लोटेकर यांनी कवी जगदीशांच्या काव्य सुमनांचा फुलोरा रसिकांसमोर सादर केला आहे. या काव्य सुमनांनी लोककवी जगदीश जाधव अमर झाले आहेत. त्यांच्या या काव्यफुलांचा परिमलसुद्धा रसिकांच्या मनात असाच चिरंतन दरवळत राहो, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

कवी : **शांताराम नांदगांवकर**

'प्रशांत'
१९ ब, विसावा रस्ता,
खार (पश्चिम),
मुंबई ४०० ०५२

## : प्रस्तावना :

# कवी जगदीश जाधव यांची मन मोहून टाकणारी गीते

**–राजा जाधव**

मराठी कविता समाज प्रबोधनाचे कार्य आरंभापासूनच करीत आली आहे. माणसांच्या भावभावनांचे दर्शन तर या कवितेत घडतेच पण समाजाला दिशा देण्याचेही सामर्थ्य त्यामध्ये आहे. कालच्या कवितेमध्ये नवे नवे बदल घडत गेले आणि कविता केवळ रंजनच करीत नाही तर क्रांती घडवून आणते याचे प्रत्यंतर प्रभावीपणे आज दिसून येत आहे. स्वातंत्र्याची चळवळ घ्या, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन घ्या, कवितेने समाजात चैतन्य निर्माण केले हे आपणास लक्षात येते. अशा या कवितेमध्ये लोकगीतांना अधिक महत्व आहे. लोकगीतांमध्ये लोकांच्या मनाचा वेध घेण्यात येतो. जनतेच्या परंपरा, जनतेच्या भावना, त्यांच्या कल्पना, त्यांच्या आशाआकांक्षा, प्रेरणा लोकगीतांतून उत्कटपणे प्रकट होत असतात. ह्या लोकगीतांनी मराठी संस्कृती जोपासली आहे. त्या लोकगीतांचा वारसा कवी जगदीश यांनी स्वीकारला होता.

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवमुक्तीचे आंदोलन सुरू केले. आणि सारा भारतीय समाज खडबडून जागा झाला. या आंदोलनाची प्रेरणा घेवून अनेक कवी–लेखकांनी आपली लेखणी उचलली. आणि आंदोलनातील विचारांना सतत गतीमान ठेवण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या सर्व चळवळींत लोकांचा भरणा होता. त्या गरीब लोकांचा उत्साह गतिशील ठेवायचे कार्य या कवींनी केले हे विशेष, आहे. पर्वतीचा सत्याग्रह असो, काळाराम मंदीर प्रवेशाची चळवळ असो, १९५६ ची धर्मांतराची मोहीम असो, सर्व कवींनी आपल्या प्रतिभेचा वापर जनजागरणासाठीच केला आहे. बाबासाहेबांचा विचार खेड्यापाड्यात आणि घराघरात पोचविण्याचे कार्य या लोककवींनी प्रामाणिकपणे केले आहे. या कवीपैकी कवी जगदीश यांच्या कार्याला ऐतिहासिक मूल्य लाभलेले आहे यात शंका नाही.

कवी जगदीश यांच्या कविता संपादन करण्याचे कार्य माझे मित्र बौद्ध समाजातील एक विचारवंत कथाकार आयु. वि. घ. लोटेकर व कवी जगदीश यांचे चिरंजीव आयु. गंगाधर जाधव यांच्या सहकार्याने करीत आहेत हे पाहून मला आनंद वाटला. बाबासाहेबांचा विचार जलसाकारांनी खेड्यापाड्यात नेला आणि त्यानंतर लोककवींनी त्याला वाहून घेतले. या कवींच्या काव्याला बहार आला तो १९५६ नंतरच.

बाबासाहेबांचे महानिर्वाण १९५६ ला झाले, आणि त्यापुढचा त्यांचा जन्म दिवस अगदी उत्साहाने पार पाडण्याचा लोकांनी चंग बांधला. या जयंतीच्या दिवशी लोकरंजनाबरोबर समाज प्रबोधनाचे कार्य या लोककवींनी करण्याचे व्रत स्वीकारले. त्यात वामन कर्डक, श्रावण यशवंते, भीमराव कर्डक, लक्ष्मण राजगुरु, गुलाबराव घाटविसावे, श्रीधर ओव्हाळ, यांचा वाटा सिंहाचा आहे. त्यानंतरच्या पिढीत नवनीत खरे, राजेश जाधव, गोपचंद रुके, दिवंगत लक्ष्मण पगारे, लक्ष्मण सोनताटे, रघुनाथ गायकवाड, सुरेश कमानकर या प्रमुख लोककवींची नांवे घेता येतील. या नांवात कवी जगदीशांचे नांव लक्षणीय आहे. या नव्या पिढीचे ते नेतेच होते असे म्हणावे लागेल. कवी जगदिशांनी बाबासाहेबांच्या शिकवणुकींवर असीम श्रद्धा ठेवली होती. आणि या भक्तीपोटीच त्यांनी काव्यलेखन केले. त्या काव्याच्या प्रसारामुळेच त्यांच्याविषयी समाजामध्ये आदर निर्माण झाला होता. त्यांचा समाजात दबदबा निर्माण झाला होता कवी जगदीश यांच्या काव्याने सर्वसामान्य माणसांच्या मनावर असा काय परिणाम झाला होता की या माणसांनी कवी जगदीशांना डोक्यावर घेवून नाचावे ? कवी जगदीश यांच्या काव्यात माणसांच्या अंतःकरणाला भिडणाऱ्या भावना आहेत. बुद्धाची करुणा आहे. बाबासाहेबांचा लढाऊपणा आहे. संघर्षाची बीजे आहेत क्रांतीचे सूतोवाच आहे कवी जगदीशांनी चळवळीचे स्वरुपच चित्रीत केले बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर बौद्ध समाजात जी केवीलवाणी परिस्थिती निर्माण झाली, त्याने कवी जगदीश अस्वस्थ झाले होते. ती अस्वस्थता त्यांच्या काव्यात प्रामाणिकपणे प्रकट झाली त्यांच्या काव्यातील प्रत्येक शब्द अगदी तळमळीने व्यक्त झाला आहे. त्यांच्या प्रतिमा देखील तितक्याच प्रभावीपणे अवतरल्या आहेत.

कवी जगदीशांच्या भाषेत लाघव आहे. काव्यविलास आहे. शब्दाची नीट जाण आहे. त्यांनी जो गीते लिहीली आहेत ती सर्व गीते अनेक गायकांनी त्यांच्या बुलंद आवाजाने अभिनयासह सादर केलेली आहेत. त्यांच्या प्रत्येक गीतामध्ये सौंदर्य आहे. उपमा उत्प्रेक्षांनी त्यांची कविता अगदी फुलारून आलेली दिसते. त्यांच्या गीतांमध्ये वापरलेले शब्द अनेक सुप्त अर्थ लेवून येतात. त्यांचे शब्द कधी आग बनतात, कधी प्रेमळ बनतात, तर कधी दुःखी होतात. सामाजिक व्यंगावर त्यांनी अचूकपणे बोट ठेवले आहे. समाजातील अंधश्रद्धा, ढोंगबाजी, भंपकपणा, पुढाऱ्यांचा धूर्तपणा, कार्यकर्त्यांचा अप्रामाणिकपणा जगदीशांनी आपल्या काव्यात प्रभावीपणे रंगवला आहे.

कवी जगदीशांच्या काव्याला कोणताही विषय वर्ज्य नव्हता संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो, किंवा मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा असो,

राघू-मैनेचा संसार असो. प्रत्येक ठिकाणी त्यांची शैली तराळून आलेली दिसते. त्यांची कल्पनाशक्ती अफाट होती, एवढेच यावरून दिसते. त्यांची बुद्धी तल्लख होती, म्हणूनच त्यांनी अगदी सहजपणे काव्याला न्याय दिलेला आहे.

मानाचा मुजरा हे त्यांचे गीत विलक्षण गाजले. महाराष्ट्रावर, मराठी माणसांवर, मराठी संस्कृतीवर कवी जगदीशांनी प्रेम केले. त्या प्रेमाचं प्रतीक म्हणून त्यांचे हे गीत आहे. हे गीत शाहीर अमरशेखांनी अजरामर केलं. त्यांचे शिष्य शाहीर शेख जैनू चांद हे आजतागायत हे गीत गात आहेत. आजही ते गीत घराघरात गायीलं जातं. इतकं स्फुर्तीदायक गाणं फक्त कवी जगदीशच लिहू शकले होते. महाराष्ट्राचं वर्णन करतांना त्यांनी ऐतिहासिक दाखले दिलेले आहेत. त्यामुळे हे गीत ऐकताना बाहु स्फुरण पावतात. या काव्यात वीरत्व धगधगते आहे.

'भरे कापरे, शत्रू हादरे, धाक असे शिवरायाचा
तसेच बाजी, वीर तानाजी, धनाजी अन् संताजीचा
शूरवीरानी, झेंडा जयांनी, अटकेपार रोविला ॥

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या ऐतिहासिक जागी बौद्ध धम्माची दीक्षा दिली, त्या नागपूरचे महात्म्य कवी जगदीशांनी अचूकपणे टिपलं आहे. नागपूर म्हणजे त्यांना बौद्ध संस्कृती आठवते. बाबासाहेबांची वाणी ऐकू येते.

'इथेच घुमली भीमाची वाणी
इथेच झाले भवाचे पाणी
आळविता बुद्ध नाम'

महाराष्ट्रावर त्यांचे प्रेम जितके आहे त्याहून अधिक देशावर आहे. देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या गीतातील ह्या ओळी स्फूर्तीदायकच आहेत.

'नारंगी हा रंग जैसा, शीवशाहीचा वसा
रंग हिरवा मोकळा जणू, मार्ग हा सकला असा
रंग शुभ्र गौतमाचा, शांतवृत्तीचा ठसा
फिरे मधोमध, जगदीशाते, अशोक चक्रांकित निशाण'

माणसांची विविध रूपे कवी जगदीशांनी पाहीली होती. दांभिक माणसांची त्यांना चीड होती. खोटे मुखवटे धारण करणारांच्या प्रवृत्तीवर त्यांनी आपल्या काव्यात घणाघाती हल्ला केला आहे. काहीही कर्तृत्व नसतांना काही माणसांना मोठेपण मिळावे अशी अपेक्षा असते. ही त्यांची प्रवृत्ती कवी जगदीशांना संतापजनक वाटते. माणसाला मोठेपण मिळण्यासाठी त्यांनी कर्तबगारी करायला पाहिजे असे त्यांना वाटते.

' नुसते बोलून का मोठेपण लाभते.
मोठे व्हाया कर्तृत्वाचे अंग लागते '

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीबद्दल कवी जगदीशांनी तळमळीने रचना केली आहे.

' मिटविण्या ही गुलामी
पहिलीच ही सलामी
जिंकला तोरणा गड
साथीला साथ ही मर्द मराठ्यांची '

कवी जगदीश डॉ. आंबेडकरांच्या विचाराने भारलेले कवी होते. दलित शोषीत समाजावर होणाऱ्या अन्यायाच्या ते विरोधात होते. भांडवलशाही, श्रीमंत जुलमी कारखानदार यांच्या निर्दयपणावर त्यांनी आसूड ओढले आहेत. श्रीमंतानी संपत्तीची अधिक हौस बाळगू नये. ती अल्पकालीन असते. सर्व गरीब माणसांना न्याय मिळावा म्हणून श्रीमंत भांडवलदारांनी आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे, असं त्यांचं मत होतं. कवी समाजवादी विचारांचा पुरस्कर्ता आहे.

' व्यर्थ म्हणशील सारे माझे
फुका घेशी डोईवर ओझे
वेडया तये वेळी तुझ्या अंत काळी
जाणे एकटेच होईल तुझे
कोणाचा तुला आधार– कोणी तुझ्या सवे ना येणार '

कवी जगदीशांनी आपल्या काव्यात सामाजिक बांधीलकी स्वीकारली होती. गरीब पिडीत श्रमकऱ्यांचे कवी मित्र होते. म्हणून श्रमकऱ्यांना आनंद देणारी, त्यांचे मनोरंजन करणारी गीतेही त्यांनी लिहीली आहेत. प्रेयसी-प्रियकरांचे मन त्यांच्या काव्यात व्यक्त झाले आहे. प्रियकराबद्दल प्रेयसीच्या मनांत असलेली ओढ ही त्यांनी शब्दबद्ध केली आहे. त्यांची ही प्रणयगीते प्रख्यात गायिका श्रीमती विठाबाई नारायणगांवकर यांनी कमालीची लोकप्रिय केलेली आहेत. तथापि कवी जगदीशांची गीते गोविंद म्हशीलकर, श्री. तुकाराम दणाणे (रेडीओस्टार) श्री. चिंतामण तांबे आदींनी आपल्या सुरेल आवाजांनी गाऊन ती चिरंतन केली आहेत.

' दु:ख विरहाचे सांगू कैसे
लागली अंतरी आग रे
आदळे शंका कु शंकांची
दिलवरा हाय लाट रे '

'अधिर मी धरा, माझीया करा
तुम्ही आवडीनं तुम्ही आवडीनं
सख्या दिलवरा, बैसवा जरा
कोंदणी हिरा, तुम्ही गोडीनं
जीव आपुला एकच राया
काया जरी या दोन

स्त्रियांच्या मनातल्या प्रेमाचं जसं कवी वर्णन करतात तसेच त्यांच्या सौंदर्याचंही ते दिलखुलासपणे चित्रण करतात.

'दिसतो आज हा न्याराच रंग
दंडात किनखापी चोळी तंग
बोलते चटपट, लवते झटपट
केतकीवाणी गोरे गोरे हिचे अंग
जशी ही कवळी शेंग चवळयाची'

कवी जगदीशांनी आपल्या काव्यात अनेक विषयांना स्पर्श केला आहे. लग्नानंतर सासूबाईचा आलेला नव्या नवरीला अनुभव, नव्या फॅशनमळे लहान मुलांमुलींवर, शाळा कॉलेजातील विद्यार्थी विद्यार्थीनींवर झालेला अनिष्ट परिणाम, कोवळया वयाचा झालेला कोंडमारा, कुटुंबातील बेबनावामुळे होणारा संघर्ष, भावाभावात होणारी भांडणं याबद्दल कवी जगदीशांनी आपल्या रचना करून समाजाचे आंतरचित्र उभे केले आहे. त्यांची काही लोकगीतं आबालवृद्धांच्या जीभेवर अजूनही ताजीच असल्याचे वाटते. नव्या नवरीचं वर्णन पहा.

'गळयात गळसरी घालशील गो
ऐटीनं ठुमकत चालशील गो
गुलगुल कानात बोलशील गो
जोडीनं संगाती फिरशील गो'

मुंबईच्या चाकरमान्याबद्दलची भावना त्यांनी अलगदपणे चितारली आहे.

'आता झालाय ममयवाणी
तुला लागलं ममयचं पाणी
आता कुठलं रं तुझ्या ध्यानी
तुझी हौसा इथं दीनवाणी
सोशिते हाल पण तू खुशाल
खात ममयचा मेवा'

या काव्यसंग्रहात अनेक लक्षणीय गीते तर आहेतच. पण कवी जगदीशांनी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्वाणानंतर पुढाऱ्यांच्या मध्ये जी भांडणे झाली त्याचे वर्णनही केले आहे. गोमूच्या नवऱ्याचं वर्णन केलं आहे. मकाळच्या झुंजूमुंजूचं वर्णन केले आहे. तरुणीच्या गिर्रेबाज वृत्तीचं वर्णन आहे. चिमणीचं गाणं आहे. माणसांच्या मुर्खपणावर आधारलेलं 'गाढवाला गुळाची चव काय' असं गीतही आहे. आणखी एका गाजलेल्या गाण्याचा उल्लेख करणं मला महत्वाचं वाटतं. हे गाणं एकेकाळी लोकप्रियतेच्या शिखरावर होतं.

'बाळू माझा हा मुंबईवाला गा
जसा नटून साहेब आला
माझ्या बाळूचं खमीस
जशी मेंढ्याची भीस
नाही तोटा चित्रा मोराला गा'

त्यांचं अंगाईगीतही दीर्घकाळ लक्षात राहील असं आहे.

'चांदणे हे शीतल थंडगार छाया
तुझी ही नाजूक सुकुमार काया
हातपाय इवले इवले
बाळ तान्हे माझे चिमुकले
झोका देते लडीवाळा'

कवी जगदीश यांची प्रेरणा डॉ. आंबेडकर व भ. बुद्ध होते. त्यांनाच त अखेर शरण येतात.

'धूळ तव पदाची होवून देवा
करीन रात्रंदिन तुझीच सेवा
दयाघना, मग मिळो ना मिळो
पोटाला पोटभर भाकरी'

कवी जगदीश यांची शैली आनंददायक आहे. त्यांची स्वतःची म्हणून एक शैली होती. ही शैली, त्यांची शब्दरचना वाक्याला साजेसे सामर्थ्य देण्याचे कसब त्यांच्यामध्ये होते. म्हणूनच सर्वसामान्य रसिकांनी त्यांना आनंदाने डोक्यावर घेतले. त्यांचा गौरव केला.

एका असामान्य प्रतिभेच्या कवीच्या कवितांचा हा संग्रह रसिकासमोर येतो आहे त्यामुळे लोकाना पुन्हा पुन्हा ती गीते वाचून आनंद लुटता येईल. त्यांचे रंजन होईल. प्रबोधन होईल. माझे मित्र वि. ध. लोटेकर व कवींचे चिरंजीव यांचे कौतुक करून कवी जगदीशांच्या काव्यास लोकप्रियता लाभेल अशी शुभेच्छा व्यक्त करीत आहे...

रातोडी–मार्वेमार्ग, मालाड (प.) मुंबई
दि. २।१०।८७ धम्मचक्र प्रवर्तन दिन.

# मनोगत

श्री. तुळशीराम हरीभाऊ जाधव उर्फ कवी जगदीश (आम्ही त्यांना बुवा म्हणत असू) यांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित करीत असताना आम्हाला आनंद होत आहे. पण हा काव्यसंग्रह प्रकाशित होत असताना ते हयात नाहीत याचे दुःखही होत आहे. कारण दिनांक २८ फेब्रुवारी १९८७ रोजी त्यांचे देहावसान झाले. १० जानेवारी १९३१ साली अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेल्या या सर्वसामान्य माणसाने आपल्या काव्याने अखंड महाराष्ट्र ढवळून काढला. ते हयात असताना त्यांच्या काव्यावर एक लेख (प्रतिभावंत लोककवी जगदीश, दैनिक मुंबई सकाळ, दिनांक १० जानेवारी १९८७) प्रकाशित झाला. तो स्वतः त्यांनी वाचला. तसेच त्यांच्या निधनानंतर त्यांच्या काव्यावर (सामाजिक जाणेवेचा कवी जगदीश, दैनिक 'लोकसत्ता' दिनांक १४ मार्च १९८७) हा दुसरा लेख प्रकाशित झाला. असा हा एकमेव कवी म्हणावा लागेल.

कवी जगदीश यांनी सामाजिक बांधिलकी पत्करून आपले चौफेर काव्यलेखन केले. त्यांच्या लिखाणाचा, विचारांचा मुलभूत गाभा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान हे होते. त्यापोटीच त्यांनी दापोली येथे बांधण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकास स्वतःची जमीन विनामूल्य दिली. त्यांच्याबद्दल असणाऱ्या असीम प्रेमभावनेतून त्यांची गीते त्यांच्या निधनानंतरही समाज–पुरुषासमोर सतत राहावीत या एकमेव विचारातूनच हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात महत्व प्राप्त झाले आहे.

हा काव्य संग्रह प्रकाशित करीत असताना त्यांची काव्य मान्यवर गायकांनी उदा. महाराष्ट्र शाहीर अमर शेख, गोविंद म्हशीलकर, प्रल्हाद शिंदे, उर्दू कव्वाल जानी बाबू व विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर तसेच इतर ज्ञात अज्ञात गायकांनी गायीली त्यांचे मनःपूर्वक आभार मानणे हे आमचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे या कामी ज्यांनी हस्ते परहस्ते आम्हाला मदत केली त्यांचे ऋण आमच्यावर आहेच.

साहित्य समीक्षक, 'चिंतन'कार राजा जाधव यांनी या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहून देण्याचे मान्य केले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. आमच्या विनंतीस मान देवून प्रकाशकाची जबाबदारी घेणारे आमचे मित्र श्री. अरविंद पाटकर (मनोविकास प्रकाशन) यांचेही मनःपूर्वक आभार. तसेच स्टार प्रिंटर्स, अलिबाग यांनी थोडक्याच वेळात सदर काव्यसंग्रहाची सुबक छपाई करून दिल्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !

प्रसिद्ध कवी शांताराम नांदगांवकर यांनी काव्यसंग्रहाला दोन शब्द दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. श्री. अशोक रोकडे यांनी मुखपृष्ठ सजावट करून दिल्याबद्दल त्यांचे आभार.

मुंबई, धम्मचक्र प्रवर्तन दिन — **गंगाधर तु. जाधव**
दिनांक २ ऑक्टोबर १९८७ — **वि. ध. लोटेकर**

# ‘ मानाचा मुजरा ’

या देशासाठी रणभूमीवर
प्राण जयांनी वाहीला
महाराष्ट्राच्या शूर वीरांनो तुम्हालाच पहिला
घ्या मानाचा मुजरा, घ्या मानाचा मुजरा
भरे कापरे, शत्रु हादरे, धाक असा शिवरायाचा
तसेच बाजी, वीर तानाजी, धनाजी अन् संताजीचा
शूर वीरांनी, झेंडा जयानी, अटकेपार रोविला

जिवात जीव, असे तो लढली, मर्दानी झांशीवाली
वासुदेव अन् मंगल पांडे, यांनी प्राणांची आहुती दिली
या देशासाठी, तात्या टोपेने फास गळी अडकाविला

इंग्रजांशी हक्कासाठी, अनंत कान्हेरे लढला
तो दामोदर, हरी चाफेकर, हाय मृत्युमुखी पडला
चिरडला गेला बाबू गेनू उभा रक्ताने न्हायीला

मधु चौधरीच्या डोक्याचे रज रज केले मेंदूचे
मोटारी सवे ओढीत नेले प्रेत रामगीर साधुचे
हिरवे गुरुजी, नथु कांबळे यांनी मृत्युदंड साहिला

घाडीगांवकर, बंडू गोखले मुंबईसाठी बळी पडले
गोलतकरा सवे आणखी जे वीर हुतात्मे झाले
कवन करुनी जगदिशाने मुजरा तयांना गायीला

□

# रसिका या भूवरती

मन-रंजनाच्या पणती
वळू कल्पनेच्या वाती
उजळू मनाच्या ज्योती
रसिका या भू-वरती

नाचू गाऊ आनंदे वाहू– तन मन शारदे चरणी
बहरल्या अथांग, हिरव्यागार साहित्य कुरणी
असतील गळून पडले– तृण तर्पणी जे जडले
शोधू विखुरले मोती

तबकामधल्या, निरंजनासम, कायम जळतच रहावी
चढाओढ ही परंपरेची, गाणी सुरामध्ये गावी
परि संपताच गाणे- निर्णय अखेर देणे
रसिका तुझ्याच हाती

काय हवे बा, रसिकजना तुज, मंगल या सु-समयी
मनन करिता, काव्यरूपाने, जगदिशाच्या हृदयी
सद्भावना ही वसली, इथे जाणकार बसली
आज मंडळी ही श्रोती

□

□

# ' अजंठा साची '

अजंठा साची बुद्ध-गयेसम
रम्य विशाल हे ग्राम
नागपूर माझे पवित्र हे धाम

इथेच घुमली भिमाची वाणी
इथेच झाले भवाचे पाणी
आळविता बुद्धनाम

इथेच घडली मंगल क्रांती
इथेच लाभली जिवना शांती
जिंकीयला संग्राम

इथेच भिमाई हसली रडली
इथेच प्रीत बुद्धाशी जडली
खर्चीयले ना दाम

इथेच भरला जीवनी रंग
इथेच झाला जगदिश दंग
नागपूर कैवल्य धाम

□

# " किर्ती इंदिरेची गाजते "

किर्ती इंदिरेची गाजते
बाय बाय किर्ती इंदिरेची गाजते

दांडगाईची रीत अपार– कुचलली बाईने
छक्क्या पंज्याची तिरडी पार– कुचलली बाईने
आणी बाणी अशी नामी, रणशिंग ते संग्रामी
वीस कलमी वाजते

आम नोकरवर्ग हा आम– झुकविला बाईने
वक्तशीरपणा हा मुद्दाम शिकविला बाईने
अंधाधुंदीत जे धुंद– अंधाधुंदीच केली बंद
नाव जगी आज ते

किल्ली जादूची ही हमखास– फिरविली बाईने
खोड स्मगलरी धेंडांची खास– जिरविली बाईने
धीर दारुवाला सोडी, अशी पळता भुई थोडी
पाणी गुंडा पाजते

नव्या बस्तानाचे अवसान– जमविले बाईने
माजलेले गब्बर धनवान– नमविले बाईने
पडे जगदिशा धाक– असं बाईचं ते डोकं
युक्त्या नामी योजते

□

# ‘ वर्चस्वाचे अंग लागते ’

नुसते बोलून का मोठेपण लाभते
मोठे व्हाया कर्तृत्वाचे अंग लागते
लोक देतील तुला मान मोठा परो
मान घ्याया वर्चस्वाचे अंग लागते

ठेव वारसदारा थोडे बाजूला तू
जागा तीन हात बेवारश्याही मिळे
वेडया मेल्यावरी, चार चौघानी तो
खांदा द्याया नशिबाचे अंग लागते

पुण्य साठविले जर इतुके तुवा
हट्ट चंदन– चितेचा कशाला हवा
चंदनासाठी धन, दौलतीच्या गहन
बाजुबंद ऐश्वर्याचे अंग लागते

दाव जगदिशा तू ऐसी कारागीरी
कवी टागोर अन् भारा तांबे परी
नांव चमकावया, लेखणीला सदा
कल्पनेच्या सौंदर्याचे अंग लागते

□

# ' दोन घटकेचा बाजार '

कोण श्रीमंत कोण सावकार
कोण गरीब कोण लाचार
येथे कोणाची जीत अन् कोणाची हार
दोन घटकेचा वेड्या बाजार

व्यर्थ म्हणशील सारे माझे
फुका घेशी डोईवर ओझे
वेड्या तये वेळी तुझ्या अंतकाळी
जाणे एकटेच होईल तुझे
कोणाचा तुला आधार– कोणी तुझ्या सवे ना येणार

येथे नाही कुणी कुणाचे
जग लोभी सारे धनाचे
हसुनिया बळे कापताती गळे
रक्त-पिपासू भुकेले प्राणाचे
विसरूनी सारे उपकार– अशा युगाचा धिक्कार

माल महाल वैभव सारे
जागच्या जागी राहील बारे
ना कुणाचा खरा– इथे कायम थारा
वेड्या शरण भगवंता जा रे
तोच दुनियेचा तारणहार– तोच जगदिशा तुझा आधार

□

# ' नामांतर '

जीव गेले किती मोजू नंतर
जिवड्यांना हवे या नामांतर
जिद्द ही विद्यापीठापुरती
पण त्या मराठवाड्यावरती
नांव झळकु द्या भिमराव आंबेडकर

जाळा घरे जाळा– जाळा पोरा-बाळा
वाटें तुम्हा कुणी ना वाली
जनता जर का एक ही झाली
कापेल भूमी ही अशी थर थर

लुटा गांवा लुटा– लुटा अब्रू लुटा
कराल घात ऐसा आमुचा
कापू गळा आम्ही ही तुमचा
त्या काकडीवाणी असा चर चर

एका ठाई गोळा– नागपुरचा मेळा
पोटशूळ पोटातील हा गोळा
म्हणूनी खुपते का रे डोळा
जगदिशा भिमाचे धर्मांतर

□

## ' पहाट '

थकले मी पाहून तुझी वाट रे
राया बघ झाली पहाट रे

पक्षी उडाले घरट्यामधूनी
सरली चांदणी रात रे
उजाडले पण हृदयी माझ्या
अंधार सख्या दाट रे

दु:ख विरहाचे सांगू कैसे
लागली अंतरी आग रे
आदळे शंका कु-शंकाची
दिलवरा हाय लाट रे

जरी टाळशी तू हाय परंतु
तुझाच मजला ध्यास रे
मरेन तुझीया चरणी सख्या मी
बघ ही अंतरी गाठ रे

तुज मानियला मी देव माझा
तुझेच ओठी नांव रे
तुजविना कैसा चढू जगदिशा
प्रित– मंदीराचा घाट रे

□

# ' नेहरु चाचा '

कोणी तुम्हावर आज हे ऐसे जाळे टाकले
बोला नेहरु चाचा काहो डोळे झाकले

आलो आशेने आम्ही बालके तुम्हाकडे
रुसवा का धरला बोला आम्हाशी गडे
काहो बोलत नाही, कोणी तुम्हा आज रोखले

नको आम्हा तुमची ती गुलाबाची फुले
द्वार डोळ्याचे करा फक्त एकदा खुले
तरीही मग सांगा आमचे कोठे चुकले

हाय जगदिशा परी मृत्युशय्येवरी
वाहतो अश्रुंची श्रद्धांजली ही खरी
अन् हाय इवले आम्ही जीव चिमुकले

□

# ' देश माझा महान '

जय जवान जय किसान
गात चल हे स्फुर्ती गान
देश माझा हा महान
देश माझा हा महान

भर किसाना कष्टाने हा धान्यांचा कोठा असा
कर जवाना आधुनिक, शस्त्रांचा साठा असा
कर स्वंयभू उन्नतीने, देश हा मोठा असा
जन्मोजन्मी, ना आटो ही सुखसमृद्धीची खाण

विद्वत्तेचा वृक्ष ऐसा, जो कुणी लावी सदा
मोठमोठ्या वैज्ञानीका, वाट तो दावी सदा
गगनचुंबी हिम कड्यासम ताठ तो ठेवी सदा
शिक्षणाचा तिसरा डोळा, उंच या देशाची मान

नारंगी हा रंग जैसा, शिवशाहीचा वसा
रंग हिरवा मोकळा जणू मार्ग हा सकला असा
रंग शुभ्र गौतमाचा, शांत वृत्तीचा ठसा
फिरे मधोमध, जगदिशाते, अशोक चक्रांकीत निशाण

□

# सोनं हे सद्‌गुणाचं

सोनं हे सदगुणाचं जरा लाव कसाला
नखऱ्यात काय कामाचा हा गरम मसाला

नखऱ्यात सुंदरी त्या कैक झाल्या खाक
घोडं बुद्धीचं हे जरा ग विचाराने हाक
मान गुऱ्हाळात हा उसाच्या रसाला

फॅशनवरी तुझ्या उलटेल हे वारे
होतील उद्या केस हे काळयाचे पांढरे
जपशील ग जपून किती कुरळया केसाला

हे मानवी जीवन पाण्याची जणू वाफ
ही रंगोटी नको ग मन हवे हे साफ
भाव धुण्यापुरता साबणाच्या फेसाला

अवखळपणाचे हे गिरवू नको धडे
ऐक जगदिशाचे शीलसंपदेपुढे
किंमत ना कवडीची अत्तराच्या वासाला

□

# ' बोला मामी तरी '

काहो बसला दुरी– बोला मामी तरी
जावई मी आलो पाहुणा तुमच्या घरी

मारीता आपुल्या मुलीशीच गप्पा
नव्या पुराण्या खमंग या थापा
जावई बसले दाद न याची
काळजी किती ही पोटच्या मुलीची
राग का मजवरी, बोला मामी तरी

नका जावयाला कोंबडं कापू
म्हणा परंतु जावई बापू
चहा तरी द्या बिन दुधाचा
दुष्काळ असला जरी साखरेचा
भागवा गुळावरी, बोला मामी तरी

नका नसेल तर भोजन वाढू
शिरापुरी अन् बुंदी लाडू
प्यायला द्या लोटा भरुनी
बिन पैशाचे थंडगार पाणी
नव्हे ही मस्करी, बोला मामी तरी

लेक ही हौसा लाडकी तुमची
म्हणाली येते याद आईची
म्हणुनी झाले इथंवर येणे
जगदिशा ना दुसरे घेणे
जायचे लवकरी, बोला मामी तरी

□

# तारें अकलेचे तोडू नको

थांब जरा वेडचा प्रेमवीरा
तारे अकलेचे तोडू नको
लाज वेशीवर अशी सोडू नको

दिसतोस पक्का टवाळखोर
मी तर भल्या कुळातली पोर
दावूनी ऐसा मस्तीचा जोर
भलतेच नाते जोडू नको

नसता मी राजी बळजबरी तुझी
का मनधरणी करशी माझी
वाटली का प्रित मुळ्याची भाजी
भाजी समजून तोडू नको

झालास खुळा का असा वेडा
आवर तुझ्या प्रितीच्या लाडा
टाळून प्रिती गंगेत खडा
अंदाज गंगेचा ताडू नको

दीप तुझ्या का अकलेचा विझला
ऐक सांगते ठासून तुजला
ठायी ठायी अडवूनी मजला
जगदिशा ऐसा छेडू नको

□

□

# नवा जमाना

जमाना नवा हा
ते ओठ लाल पाहीजे
हल्लीच्या तरुणा
हे गोरे गाल पाहीजें

कसली ही फॅशन
त्या पोरीवानी लांब
आजच्या मुलांना
ते हिप्पी बाल पाहीजे

नको वाटे शाळा ती
रोज हवी पिकनीक
सदा नाच गाण्यांची
बस धमाल पाहीजे

अधुनिक युगाचा
अधुनिक हा सरगम
नित्य डान्स डिस्को
हा नवा ताल पाहीजे

म्हाताराही म्हणतो
दाम दुप्पट देईन
करकरीत कोरा तो
नवा माल पाहीजे

वदे हेच जगदिश
हल्लीच्या पिढीला
नव्या सिनेमाची
नवी चाल पाहिजे

□

# जवानीचं तारु

संभाळ जवानीचं तारु हे संभाळ ग
पोरं हल्लीची भारी ही टवाळ ग

लचकणं मुरडणं हा ढंग तुझा पाहून
हे तरुण पिढीचं तुफान घोटी लाळ ग

जा परि जपून जा, त्या जत्रेला तू जाशील
भिती पाळण्याची हा संयम तू पाळ ग

देवळात प्रितीच्या ते रंगताच किर्तन
वाजतील निंदेचे मृदुंग नी टाळ ग

नसता हा शिमगा तू खेळशील होळी
जाळील ही काया तो वासनेचा जाळ ग

जगदिशा परि त्या स्वरूप-चोरा टाळून
घाल 'सु' वराला तू मंडपात माळ ग

□

# औषधाला राम

या फॅशनीत हल्लीच्या ना औषधाला राम
ही राधिका बदनाम गेला भंजाळून शाम

प्रदर्शन राधेचे अर्धनग्न केवळ
झटक्यात यावी त्या कृष्णाला भोवळ
चाळ्याने या आईबाप चोळी माथी बाम

वंशज त्या हिप्पींचे खरे की हे खोटे
बनलेत जटाधारी कृष्ण सान मोठे
फुटे अंगी न्हाव्याच्या दरदरुनी घाम

शाळा अन् कॉलेज, नळ, दूध-केंद्र
दिवसाही दिसे तिथे राधेला तो चंद्र
पिते दूध मांजर मिटूनी डोळे जाम

जगदिशा तारे हे उगवते उद्याचे
घेवून गोपिका ते गोविंद सद्याचे
गाठतात एकांती सिनेमाचे धाम...

□

# मदन मंजीरी

इंद्राची परी, रूप सुंदरी मदन मंजीरी
रूपाची मी खाण, रूपाची मी खाण
उठा राया लुटा बिगी सोनं

वागणं लहरी, नजर ही गहरी
पाडीते भूल, पाडीते भूल
नयन शराबी, ओठ गुलाबी
जसं लाल गुलाबाचं फूल
फुलामध्ये या, हळुच मारा
इष्काचा नाजूक बाण

अधिर मी धरा, माझीया करा
तुम्ही आवडीनं तुम्ही आवडीनं
सख्या दिलवरा, बैसवा जरा
कोंदणी हिरा, तुम्ही गोडीनं
जीव आपुला एकच राया
काया जरी या दोन

□

# झुरते ही मैना

हौसा– किती समजाऊ ध्यानी कसं येईना
राघू वाचून झुरते ही मैना

पिराजी– नको दावूस पिरतीचा आईना
बघ झाली या जिवाची दैना

हौसा– मनाचं पाखरु उडतंय भुरभुरु
काय त्याला करुं, कसं आवरुन धरु
मम हृदयाच्या पिंजऱ्यांत राहीना

पिराजी– हीच माझी तऱ्हा, छंद जडला खरा
तुज वाचून मला, करमेना जरा
सय कामधंद्याची मला होईना

□

## शतशः तुला प्रणाम

अवतार घेवूनी पृथ्वीतळी या मुद्दाम
येरे देवा, शतशः तुला हे प्रणाम
येरे बा देवा येई-विनंती हीच पायी
दिलासा भाविकांना-तुझ्या कोणी ना देई
राज्यकर्त्यांच्या ठाई-वसे बेबंदशाही
जशी सावत्र आई-जीव घेते महागाई
पोसल्या जाती गुंड-अराजक माजे बंड
त्रासले नगर अखंड-नगरसेवकही थंड
ऐन मोक्याला दंड-ठोकती हे बलदंड
तेल तूप गुळसाखर-गडप करती हे षंढ
थट्टा देशाची थट्टा-लॉटरी बिटींग सट्टा
मागल्या हाते खातो-माल कमरेचा पट्टा
भट्टीचा नट्टा पट्टा-लोकशाहीला बट्टा
करीतो लोका पागल-जसा तो गोलपिठा
नोट ही नोटीवाणी-बनावट खोटी नाणी
खोलुनी छापखाना-दाबी मुस्काट कोणी
तमाशा नाच गाणी-पडेना किर्तन कानी
तुलाच ठावे देवा-कुठं मुरतंय पाणी
रंग रंगीन माडीत-लूट ही लोकल गाडीत
सहाय्य खाकी डगला-सदा ह्या टोळ धाडीत
टांगता जीव बेडीत-मध्यानं रात्री होडीत
प्रसंगी बुडल्या जाती-विटा सोन्याच्या खाडीत
पार्सली येती सोळा-अफू गांज्याचा गोळा
चुके इथेच कसा-अधिकाऱ्याचा डोळा
लुचपतीला ना आळा-डाग लाचेचा भाळा
चालतो जगदिशाचा-धंदा तेजीत हा काळा

□

## सावध असावे

वागणे हे अल्लड ग इतुके नसावे
वय आता लग्नाचे सावध असावे
न चुकूनी हसावे, हसूनी फसावे

उफाळती ग तुझी ज्वानी तुजला पाहुनी
खटचाळ तो कोणी खुणविल डोळयांनी
कि नजरेत ज्याच्या पाप हे दिसावे
न साऊलीला सुद्धा अशाच्या बसावे

ठाई ठाई ह्याच पोरी धोका, बघूनी तव झोका
कुणी प्रेमी पक्का, मारील ग धक्का
अशा धक्क्यापासून दूर तू असावे
या टवाळांच्या टोळीत कधी ना घुसावे

ना जमाना हा बाळे चांगला करण्या खूष तुला
म्हणेल शशिकला कुणी मधुबाला
न किडूक या स्तुतीचे काळजा डसावे
अशा भूल-थापांना मुळी ना फसावे

दुनिया ही अशी धोकेबाज निर्भिड निर्लज्ज
सदैव ही सज्ज लुटावया मौज
जगात न अब्रुचे खोबरे किसावे
बोल जगदिशाचे हे हृदयी ठसावे

□

# असा हवा भरतार

जसा रूपवान गुणी दिलदार
तसा लढवय्या शूर सरदार
ग बाई मला असा हवा भरतार

मिशा मर्दानी झुबकेदार
सदैव कमरेला तलवार
देह पोलादी छाती भरदार
आणि ते दंड भरीव पिळदार

सदैव लढून रण-मैदानी
पाजील वैऱ्याला जो पाणी
मुखाने गर्जंत जयजयकार
जो नेईल झेंडा अटकेपार

घालून गळी तयाच्या माळ
गाईन गुण मी सांज सकाळ
घेवून तळ हातावर शिर
करिल जो माय-भूचा उद्धार

□

# खेळ शाहीरी डाव

खेळ शाहिरी डाव, मर्दा पाणी तुझे हे दाव
सांगणे माझे तुला
तू असशिल बाजीराव पण खांद्याला खांदा लाव
सांगणे माझे तुला

ऐक नरा कवीश्वरा– बोल जपुनी जरा
सांभाळून तोंड रे
आहे ठावूक नांव, मारु नको मिशावर ताव

कसा भिऊ तुला बरं, तू तर एक मांजर
ताटाखालचे
करु नको मॅंव मॅंव, टाकीन उधळून तुझा डाव

ओळखले तुला मी तर, धाव धावशिल कुठवर
कुंपणाच्या आंत रे
सरडचा तुझी ही धाव, खाशील उगाच कारे भाव

जगदिश माझा भला, गुरु गितारुपी आला
मुंबईवरुनी
उतराया तुझा बडेजाव, राखण्या कादीवलीचे नांव

□

# राधा गवळ्याची

उभी कां अंगणात राधा गवळ्याची
पहाते जणू वाट हरी सावळ्याची

नेसून शालू हा नवा जरतारी
करून थाटमाट ऐन दुपारी
राधा वेडी–डोळे मोडी
दिसे हिला भारी शोभून गडे न्यारी
नाकात नथ छान मोत्या पवळ्याची

काजळ नयनी वेणीत गजरा
वाट बघूनी शिणल्या नजरा
कुंकु भाली–हसुनी गाली
करी चाळा अधरात धरुनिया पदरा
दिसाया भोळी पण नजर कावळ्याची

दिसतो आज हा न्याराच रंग
दंडात किनखापी चोळी तंग
बोलते चटपट–लवते झटपट
केतकीवाणी गोरे गोरे हिचे अंग
जशी ही कवळी शेंग चवळ्याची

घोळ निऱ्याचा हा कमरे खोचून
थकली आंगण दारी नाचून
नजर ढळेना–परी कळेना
या गोकुळ नगरात जगदिशावाचून
किंमत ही कुणा राधेच्या सोवळ्याची

□

## बोल मोलाचे

बोल मोलाचे तागडीत तोल
तोल वेडचा दुनिया ही गोल
रंकाचे राव बनती इथे
अन् चोराचे बनती साव इथें
उरले ना देवाचे नांव इथे
सुळसुळाट चोरांचा लफंग्यांची गर्दी
नको लेखीनामा नको त्यांसी वर्दी
सत्ता जयाची तोच इथे पारधी
तोच इथे राजा तोच इथे गारदी
करी जमान्याशी जो का दगलबाजी
करी जग त्याच्यापुढें हाजी हाजी
बने तोच काझी बने तो मुल्लाजी
भरपूर चाले इथे वशीलेबाजी
तऱ्हा जमान्याची अशी निराळी
घाव खोटचाचा सत्त्या-कपाळी
ब्र म्हणता येई मरणाची पाळी
इथे वाजे एका हातानेच टाळी
कुणी घोडा मध्येच स्वतःच उडवी
कुणी हौसेखातर घरदार बुडवी
नाही हौसेला दुनियेत मोल

□

## सरकारी कायदा

पुरे मुले ही तीन
चवथ्याला बंदी जारी
निघाला ग सरकारी
हा कायदा–घे करुन फायदा...

चल सल्ला डॉक्टरचा घेवू
गुण लाल त्रिकोणाचं गावू
पाळुनी पथ्य सुखे राहू
कुटुंब छोटे हांसत खाऊ
तळुनी तुपात मैदा...

पाळणा वदतो आरशाचा
बाळ अजून तो वर्षाचा
भावनावश त्या स्पर्शाचा
खेळ नको संघर्षाचा
पुरे आता गोयंदा...

संतती बंधन हाच मुळी
बांध हा ताईत सखे गळी
खुलु दे जगदिशाची कळी
वायदा पक्का वायदा...

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ...
...शाखा (...)

## शिवराया

लाज राखीली महाराष्ट्राची
त्या धर्म-पालनकर्त्याची
लाज राखीली महाराष्ट्राची
त्या देश-प्रेमी शूरवीराची
जयंती ही शिवरायाची
जिजामाऊलीच्या पोटी
त्या शिवनेरी तटी
ज्योत उजळली स्वातंत्र्याची
स्वधर्म स्वाभिमानाची
रण-मैदानी पुण्यात
त्या शनिवार वाड्यात
बोटे छाटून केली जीते
फजिती शाहीस्तेखानाची
मिटविण्या ही गुलामी
पहिलीच ही सलामी
जिंकीला तोरणा गढ
साथीला साथ ही मर्द मराठ्यांची
घेवूनी समक्ष भेट
थेट फाडुनीया पोट
वाट दाविली अफजुलखाना
या पठ्ठ्याने स्वर्गाची
आणताच ती धरुन
(कल्याणच्या) सुभेदाराची ती सून
आई म्हणुनी सन्मानाने
केली सोय चोळीखणाची
जगदिशा रे या जगी
बहुमोलाची देणगी
महाराष्ट्राला दिधली जयाने,
जाणीव ही कर्तव्याची □

# सलामी घ्या ही मानाची

हुतात्म्यांनो या राष्ट्राच्या
सलामी घ्या ही मानाची
कि इतिहासात रंगली
कहाणी नव जवानांची

करुन कोट देहाचा कि लढला मर्द तो बाजी
शिरे खिंडीत उडविली कैक त्या शूर खानांची

कि लढली झाशीची राणी, कमाल तात्या टोपेची
हीच ती बाबू गेनूच्या निशाणी रक्तदानाची

मरेन माय-भूसाठी परी ना जिद्द ही सोडीन
कथा ही वासुदेवाच्या त्या कट्टर स्वाभिमानाची

सीमेवर हाय जगदिशा गनिमा पाणी पाजीले
ना केली पर्वा त्या अब्दुल हमीदाने ह्या प्राणाची

□

## इश्य बाई अय्या गडे

काळ जुना तर बदलून तो गेला
जमाना हा आला
कि इश्य बाई अय्या गडे

बघा तरुणींचे हे ओठ कसे लाल
कपाळाचं कुंकू हे ओठावरी आलं
कि शिक्षणाने या घोटाळा हा केला

सांगावं कुणा हे बोलण्याची चोरी
मर्दावाणी जातात नोकरीला पोरी
दांडगा इतका पोरींचा वशीला

मर्द वाकले, काढी नार पुढे छाती
कंकणाच्या ऐवजी रिस्टवॉच हाती
समान हक्क हा लइ पुढे गेला

जुने जगदिशा ते सोने म्हण पुराणी
बायकोच्या हाताशी मर्द भरी पाणी
बदल हा किती मर्दामध्ये झाला

□

## जिवाचं हाल मैतरा

काय सांगू जिवाचं
हे हाल मैतरा
पडलो पिवून गटारात
काल मैतरा
काम काज करुन–निघालो मी घरुन
तोच मित्र तो वदला हाताला धरुन
गप्प का असा तू
चल जावूया थोडेसे येवूया फिरुन
आहे माझ्या खिशात
आज माल मैतरा
फिरता फिरता असे–भान दोघाही नसे
पोहोचलो अड्डयावरती कळेना कसे
येता प्याला पुढे तो
मन सैराट झाले हो वेडे पीसे
काय सांगावा तेव्हाचा
ताल मैतरा
घशाखाली घातली–पर्वणीच भासली
बाटलीच्या वरी बाटली ढोसली
धुंद झाली अशी ही
मदीरेने ही माझी कुडी पोसली
पाऊले तैसी झाली
बेताल मैतरा
काय सांगु जगदिशा–पुरत्या फिरल्या दिशा
शुद्ध उरली ना इतुकी ही चढली नशा
साऱ्या गांवामधी या
माझी परवड बघताच पिकला हशा
झाली रागानं बायको ही
लाल मैतरा

□

# नक्षी बाजार

नकाशा आला रे
हा नक्षी बाजारातला

रंग फासूनी रंगविलेले ओठ हे लालम लाल
बघा हे कैसे पिकले जैसे, टमाटचावाणी गाल
सम मस्तानी ऐटबाज ही चाल
नकाशा आला रे
हा युरोपच्या खंडातला

मोठे टपोरे डोळे जैसे लोण्याचे हे गोळे
बाल हे घुंगूर काळे जैसे लोण्याचे हे गोळे
तोंड हे थपके, दिसते जैसे, गोदरेजचे टाळे
नकाशा आला रे
हा बी. एस. टी. डेपोतला

पारदर्शक नायलॉन साडी अन् ब्लाऊज ही तंग
गोरा गोरा रंग परंतु उघडे सारे अंगे
कॅमेरा घे जादिशा अन् जल्दी काढ शुटींग
नकाशा आला रे
हा फिल्म कंपनीतला

□

# लोकं झिंगत्यात

इथं रंगत्यात, लोक झिंगत्यात, दारु पेत्यात पाण्यावाणी
चिंता जीवाला, नाही नांवाला, आपल्या गांवाला, प्याया पाणी...

पाण्याविन तडफडून मेली गोठ्यातली ढोरं
दुष्काळ गांवच्या गांव ती उठली पार
पर मुंबईला ना ठाव दुष्काळाचं वार
अशा काळात, धुंद खेळात, गल्ली बोळात, नाचगाणी

थंडीच्या कडाक्यात रहातो या रस्त्यावर
काढीती उपाशी दिस बायका नी पोरं
थाट रोषणाईचा पुढाऱ्यांच्या बंगल्या म्होरं
नोटा शमल्यात, दंग इमल्यात, झडे बंगल्यात मेजवाणी

रोजगार देवू पण रोजगार देतो कोण
कागद येचूनिया होईना ती गुजराण
मदतीवर आमच्या नेते मंडळीचं ध्यान
चाल आकडीची, काम निकडीची, हौस काकडीची कोल्ह्यावाणी

मागून मिळेना भीक महाग भाकर भाजी
नशिबात जगदिशा रोज ही एकादशी
गाऱ्हाणं मांडू कसं राजीवजींच्या पाशी
वाट हल्लीची, गुप्त किल्लीची, दूर दिल्लीची, राजधानी

□

# रामन राघव

जगती हे आजकाल सारे रामन राघव
लाखो हरीचे लाल, सारे रामन राघव

देवळात माजी पुजारी बसती
डोळा तयांचा दक्षणे वरती
गळयात त्यांच्या तुळशी माळा
पोरी बघूनी ते करती चाळा
म्हणती क्या है माल

दुधवाले ते भैये दुकानी
दुधात देती टाकून पाणी
लोणी हे टाळूवरचे खाऊन
टाळे जगाच्या तोंडा लावून
बांधून बसले महाल

दारुवाले मटकावाले
गिळून पैसा गब्बर झाले
पैसा बोले तैसा चाले
पैशाखाली पाप हे डोले
चालती उलटी चाल

हमाल तैसा मालीसवाला
बुट पुसणारा पॉलीशवाला
मारवाडी तो पेढीवाला
व्याज खाणारा पठाण लाला
ऐक जगदिशा हाल

□

# गुलाबी रंग साडीला

कशाला बेंडबाज्या, अन् गाज्यावाज्या
खुशाल बस माझ्या, बस माझ्या, बस माझ्या
जोडीला गुलाबी रंग तुझ्या साडीला

लावून प्राणाची साजणे बाजी
करीन कदर मी तुझी, कशाला नाराजी
धीर कशापायी ग त्वा सोडीला

पुरवीन हौस मी लाडके ग तुझी
तुज ठेवीन राजी, बघ होवून माझी
नेईन मी तुला माझ्या माडीला

वेळ कशापायी भेद झाला खुला
चल या घटकेला, आलो न्याया तुला
घेवून गाडी सासुरवाडीला

आहे जगदिश जोवरी ग भला
नको समजुस ढिला, आज ना उद्या तुला
जुंपिल सौंसाराच्या गाडीला

□

# सासुबाई

लग्न झालं आणि तुटली माया आईची
गाठ पडली आई जागी सासुबाईची
परंतु विटंबना ही गरीब गाईची
कहाणी ऐसी ही माझ्या सासुबाईची
मनाची खोटी सासु खट्याळ मोठी

लठ्ठ ही आडदांड
रचुनिया कुभांड
माझ्या संग भांड
जसं वाजं हे त्वांड
बाज्याची पेटी

येगळाच ताल
जे नाही ते बोल
डोळं तांबडं लाल
आणि जसं हे गाल
खोबऱ्याची वाटी

काय सांगु झोक
बोलण्याची टेक
पाठीला ही पोक
आणि जसं हे नाक
नळाची तोटी

जगदिशा रे साची
कथा ही सासुची
जीभ लवंगी मिरची
जशी दुकानावरची
गगन गाठी

□

# डोळचात काजळ असो

पोटभरी या पोटाला नसो
परंतु या डोळचात काजळ असो

नटणे, मुरडणे, मिरविणे
धंदा एकच हा आगळा
टापटीप अन् छानछोकी
यातच पैका हा सगळा
जावो, दमडी हातात नसो

रंग रंगोटी सदा करावी
मन या रंगातच राजी
नित्य करावा शृंगार साज
मग सुंदरता ही माझी
मनात कुणाच्या ठसो ना ठसो

न्याहाळावे मी रूप सदैव
घेवूनी समोर भिगा
दिपविता मग डोळे जगाचे
येवून माझी या अंगा
नागीन कर्जाची ही डसो

कळते सारेकाही परंतु
वागणे माझें हे न्यारे
पटो अथवा ना पटो कुणाला
वेडी म्हणूनी जग सारे
जगदिशा मजला रे हसो

□



काव्य २५६९३ २५(?)

# बेदाद

नगरी ही बेदाद रे
न्याय नाही गांवा
चोर मारी सावा
दाद इथे ना फिरीयाद रे

ना कुणासी कोण जुमानी
कळेना कुठं मुरतय पाणी
माजला ऐसा वाद रे

किंमत भावा ना भावाची
तेथे मग दुसऱ्याच्या जिवाची
घेईल कोण दाद रे

सीमाच संयमाची सुटली
ओळख परक्याची तिथे कुठली
मानली वैरीण ब्याद रे

सुडबुद्धीने समाज किडला
अन् सर्वांना जगदिशा जडला
विषमतेचा नाद रे

□

# राजा राणी

आपण दोघे याच ठिकाणी
खेळलो गोटचा पाणी
राजा राणी-राजा राणी
तुझी बाहुली बाहुला माझा
तुझ्या बाहुलीचा तो पतीराजा
फुंकलास तू सूर लग्नात
वाजविली मी पिपाणी

तुझी सुपली नी तांदुळ माझा
नाही चुकलो कुठल्या रिवाजा
हुकूम माझा सुटता भरीले
बुडकुल्याने तू पाणी

जशी खेळण्यात खेळाला गोडी
तशी तुझी अन् माझी जोडी
रवि घुसळता ताकावरती
जसे तरंगे लोणी

माझा भवरा नी तुझी जाळी
नच एका हाताची ही टाळी
हात घालुनी हाती गायीली
जगदिशाची गाणी

□

# कुऱ्हाड कशाला

दळण बुद्धींचे दळू भराड कशाला
तुटेल नखाने तिथे कुऱ्हाड कशाला

घर सोन्याहून पिवळे परी न थाट जिथं
न आवतान मानपानाची वहिवाट जिथं
लपून घरातल्या घरात लागे पाठ जिथं
तिथं लग्नाचं वऱ्हाड कशाला

कथा दुज्याची काय जिथं भले ही फसती
काय वर्णावे त्या गांवा की, ज्या गांवी नुसती
जुलूम जबरदस्ती, फसवेगिरी सस्ती
कि धूर्त कावेबाज कोल्ह्यांची जिथं वस्ती
तिथ शेळया मेंढयाचं खुराड कशाला

निघेल प्रेमिकांच्या प्रेमातून एकसूर
मराठी बोली एक गांव जरी आपले दूर
जिथं वाहे सुखानं सागराचा पूर
जडली प्रीत तिथं बेळगांव कोल्हापूर
वाई, सातारा, अन् कराड कशाला

भरले दूर प्रीती सुगंधाने जगदिशा
जखडले आज प्रीत बंधाने जगदिशा
प्रीत खेळें जिथे आनंदाने जगदिशा
जिथं घर नांदे गुण्या गोविंदाने जगदिशा
तिथं विंचवाचं बिऱ्हाड कशाला

□

# मातृभूमिच्या हुतात्म्यांना

हुतात्म्यांना मातृभूमिच्या पहिला शाहिरा
मानाचा मुजरा– मानाचा मुजरा...

कथा ही रक्ताची बलिदानांची
देशभक्तांची, वीर जवानांची
वैभवशाली ऑगस्ट पंधरा
दिन हा मंगल गोजीरा
याच तिरंगी झेंडयाखाली करतो साजरा...

व्यथा भारत-भूच्या मन– भ्रांतीची
क्रांतीकारांच्या या जन– क्रांतीची
पळता भुई ही थोडी केली
अमेरिकेच्या सोजीरा
रत्ने ऐसी जन्मा आली
मायभूच्या उदरा...

चक्र हे चरख्याचे शान देशाची
किर्ती ही देशाच्या गणवेशाची
जगदिशा बघ खिळल्या जगाच्या, गणवेशावर नजरा
शुभ्र तुझी ही टोपी खादीची, खादीचा सदरा...

□

# मागणं

आलं तुला मागणं कुण्या गावचं

नको उगी रुसू—बघ आलं हसू
सोड हा रुसवा लटका
सांग मजला झणी—माझीया मैत्रिणी
परणाया तुला काल आलं होतं पाहुणं

ना स्थिर चित्त—तुझं ध्यान कुठं
का झालीस ग बावरी
सांग मजला गडे— पाहुनी मजकडे
नव्या नवरीपरी हे नवखं लाजणं

नव्हतीस मुळी—सखये भोळी
कुठं गेला स्वभाव छंदी
तुझं हे बावरणं—पदरा सावरणं
आणि नाजूक साधंभोळं वागणं

जगदिश तुझा—बंधु राजा
असता पाठी तुझीया
काळजी का तरी—बसुनी गप्प दूरी
तारीख लग्नाची ही बोटावरती मोजणं

□

# ऐटीचा हा गडी

बघा हो ऐटीचा, ऐटीचा हा गडी
जिवावरी सासरेबुवांच्या
मारी तीन फूट उडी

स्त्री-लंपट, बायकोपायी
राहीला खुशाल घरजावई
याचे जन्मदाते खरे
बिचारे आईबाप म्हातारे
गुणामुळे या गुणी दिवटयाच्या
लागले देशोधडी

सुखाने आईबापाच्या घरी
बसूनी ऐटीत पलंगावरी
सोडी हुकूम याची राणी
मिस्टर भरा जरासं पाणी
तोच नळावर घेवून हंडा
निघे हा रामागडी

प्यारी जिवाहून या सांबा
याची गुलहौशी ही रंभा
नामानिराळा वेडाखुळा
नवरा हाच जगावेगळा
तळहाताच्या फोडावाणी
जपे तिला घरगडी

बायकोपुढे जसा हा नंदी
बसून घरात स्वयपांक रांधी
शिकवी बाईल याला धडा
असा हा जगदिशा बाईलवेडा
बायकोच्या शब्दासाठी
झिजवी कायाकुडी

□

# नवरी तू होशील गो

नवरी तू पण होशील गो
नवऱ्याच्या घराला जाशील गो

चुडा हा हिरवा भरशील गो
कपाळी कुंकू ल्येशील गो
नांदाया जेव्हा तू जाशील गो
खुशीत गाजर खाशील गो

गळ्यात गळसरी घालशील गो
ऐटीने ठुमकत चालशील गो
गुलगुल कानांत बोलशील गो
जोडीनं संगाती फिरशील गो

तनमन सारं हारशील गो
लाजून लाजून मरशील गो
उठून सकाळी न्हाशील गो
आयन्यात तिनदा पहाशील गो

माहेरी भरली येशील गो
वेडी आनंदानं होशील गो
गुण जगदिशाचं गाशील गो
बाळ एक संगाती नेशील गो

□

## पुढारी कसले तुम्ही

लेखता स्व-माते कमी कमी
मग पुढारी कसले तुम्ही

तो राव असो वा रंक
सांगावे तयांना चोख
पाळावया बिनधोक
सतंती नियमन चोख
घ्याल का इतुकी हमी हमी

जर घरात माफक मुलं
सदा बंद रहाते चूल
हे गणित दिसता खुलं
कशी होते तुमची भूल
पिकवा म्हणावं भूमी भूमी

जर संख्याबल रोखणे
उपलब्ध बहु साधने
संधी ही साधून घेणे
त्या मार्गे तुम्हीही जाणे
ऐकू येते का कमी कमी

जर समृद्ध व्हावा देश
वासनातृप्तीचे विष
जाळा आधी जगदिश
अन् मिटवा तो क्लेश
धडा शिका हा तुम्ही तुम्ही

□

# हौसा माझी

नाय नाय नाय नाय हसु मुखावर
आज खरोखर कसली, ही नाराजी
दूर का बसली, आज का रूसली
हौसा, माझी हौसा माझी

बोलेना मशी, आज ही कशी
देईना का तांब्या भरून मला पाणी
वाढीना का जेवाया आपुल्या हातानी
आपल्या घरची चटणी मिरची
कांदा भाकर भाजी

लावीना गोडी, आज ही वेडी
धरून हाताला कां माझ्या न ओढी
साथ का साथीला देईना ही थोडी
रोजच्यावाणी, माझी सोनी
करीना हाजी हाजी

बातमी नवी, जगदिशा हवी
चिंचा नी बोरं फळं ही ताजी ताजी
दोन जिवाची ही घरवाली माझी
खायना पियना, दाद ही घेयना
रंगात येईना, काळी मैना
कशी होईना राजी

□

# आळवाचे पाणी

रंग रूप हे आळवाचे पाणी आहे
दोन घटकेची चढती जवानी आहे

जिच्यासाठी ही राज्यात खळबळ
विट बाटाचा माजला गोंधळ
जणु इंद्रपरी– भासते सुंदरी
कोठे बाजीरावाची मस्तानी आहे

सांगे ताजमहाल तो आज
जीव शाहजानचा मुमताज
तिला जन्मभरी– जपला फुलापरी
कोठे शहाची ती फुलराणी आहे

जिच्यासाठी हे सर्वस्व हरले
मांस आपल्या मांडीचे चिरले
मेनका ती जशी– देखणी उर्वशी
कोठे महिवालची ती सोनी आहे

गेला बदलून हल्ली जमाना
रस चाखून थुंकावे पाना
रीत आहे खरी– जगदिशा परी
कोठे दुनियेंच्या डोळ्यात पाणी आहे

□

# नवं खटलं

नव खटलं हे लाडाचं–साधं भोळं हे खेड्याचं
उभ्या जत्रेत घाबरलं–पाखरुं माझं बावरलं

काल हौसेने फिरावया–गेलो घेवून वेडीला
खटयाळ चार वर्साचं–छबूकडं होतं जोडीला
गड्याने एका बाईचा–पदर की धरुन ओढीला
तयाने हात सोडीला–जरासा पळही काढीला
परी ते गर्दीत चेंगरलं

पाखरुं माझं गुलहौशी–महा गर्दीनं त्या चिडलं
चित्त माझ्या या हरणीचं- पुरं जत्रेवरुन उडलं
पाखराच्या माझ्या घोडं–चालता मध्येच आडलं
पुढं व्हा कोणी हे बडबडलं–धक्का बसताच धडपडलं
तोल जाता म्या सावरलं

खेळणं खेळ तमाशा–असा जत्रेचा हा थाट
दुकाने दुतर्फा मेवा-मिठाईची तिनशें साठ
लाड सजणीचं पुरवाया धावलं मन हे सैराट
काढता गर्दीतून वाट–जगदिशा बिनबोभाट
माझं पाकीट हे कातरलं

□

# गळ्याला ग सुरी

झोप ना, झोप ना, वेडे डोळ्याला ग
कन्या म्हणजे गळ्याला ग
कन्या म्हणजें गळ्याला ग ही सुरी

पोरींच्या जाती, पालका माथी, टांगती ही तलवार
हिंडती दारी, घालून पोरी, पठाणी ती चुडीदार
बंध ना बंध ना उरला चाळ्याला ग
फॅशन म्हणजे गळ्याला ग ही सुरी

रंगी बेरंगी कधी ती लुंगी, चालती पोरी हवेत
साधु परी तप, करीत हे जप, हिंडती रोज सफेद
बगळे हे बगळे हे तळ्याला ग
अब्रू म्हणजे गळ्याला ग ही सुरी

लग्नसराई, लग्नाची घाई, वाटे मुला-मुली मौज
निशदिन वाढे दुप्पट, तासा तासाला ग रोज
भाव हा, भाव हा तोळ्या तोळ्याला ग
लग्न म्हणजे गळ्याला ग ही सुरी

जावई, सूट सवेची बूट, मागता किंमती घड्याळ
निघेल उत्तम, जगदिशासम, सासऱ्याचं या दिवाळं
शोधता शोधता चावी टाळ्याला ग
जावई म्हणजे गळ्याला ग ही सुरी

□

# वागणं प्रेमळ आईचं

फुलात फूल जसं जाईचं
दुधात दूध जसं गाईचं
तसं वागणं प्रेमळ आईचं

सासरी जावं, काम करावं, आणि मरावं सदोदित बाई
माहेरी यावं, सुखात रहावं, बसुनी खावं–सदोदित बाई
भोजन रोज दुधा–तुपाचं
पुजेला लेणं उदा धुपाचं
असं राज्य माझ्या बापाचं

सासर द्वाड. भीड ना भाड, मोडीत खोडं–सदोदित बाई
माहेर गोडं, पुरवि लाड, जिवाला ओढ– सदोदित बाई
तेल चिकट जसं राईचं
अंगाई गीत गोड आईचं
तसं मन हे दादा-ताईचं

सासर आस, बाराही मास, जिवाला त्रास–सदोदित बाई
माहेर कसं, गुऱ्हाळ जसं, गोड सुवास-सदोदित बाई
माहेरी जसं गोत प्रेमाचं
आजोळी तसं राज्य रामाचं
गांव ते जगदिश मामाचं

□

# जमाना चालू

जमाना असा नवा चालू
धिंगाणा फॅशनचा हा चालू
पॅन्ट चालू, धोतर चालू, साडी चालू, ताडी चालू
चालू, चालू चालू, चालू, चालू
जग हे चालू, अन् युग हे चालू

नर तैसे हल्लीच्या नारी
हल्लीची ही पोरं पोरी
फॅशनची बनली पुजारी
नक्कल सिनेमाची सारी
शाळा अन् कॉलेजात चालू
प्रेम गल्लीबोळातही चालू

नशेबाज का येथे थोडे
गांज्या नि चरसाचे वेडे
सोडविती शब्द रंजन कोडे
उडविती मैदानी घोडे
रेस आणि रमी क्लब चालू
दारु आणि मटकाही चालू

खाया बघे लाडू बुंदी
जग हे असे छंदी फंदी
राज्यात राशनची मंदी
अन् संतती नियमन बंदी
योजना ही वर्षोवर्षी चालू
पाळणाही घरोघरी चालू

गरीबा धनिकांची करणी
नेत्यांचीही त्यात वर्णी
पापाने दबली ही धरणी
तरी चालते रंग भरणी
गल्लो गल्ली रीत हीच चालू
जगदिशा गीत तुझे चालू

□

# ममयची हवा

लागली तुला हवा, ममयच्या नवरदेवा
पण तुझी लाज राखते आज
राहून मी खेडेगांवा

आता झालाय ममयवाणी
तुला लागलं ममयचं पाणी
आता कुठलं तुझ्या रं ध्यानी
तुझी हौसा इथं दोनवाणी
सोशीते हाल पण तू खुशाल
खाशी ममयचा मेवा

मी काम मरं मरं करावं
तवा कुठं पोट हे भरावं
अन् तू तिकडं फिरावं
मनाजोगं ढंग करावं
फिराया जावं ऐटीत रहावं
अन् मी जळावे जीवा

धड हाय का घरी शेतीवाडी
अन् एखादी बैलगाडी
मी नेसते फाटकी साडी
अन् तू प्यावी दारु ताडी
जगदिशा जावून ममयला न्हावून
लावलास काय दिवा

□

# कवळी काया

मदनाची निशाणी, तुफान जवानी
घ्या जवळी घ्या कवळी ही काया
रात जाईल उडून ही वाया

अजून केवळ, मधाचं मोहळ, लटकतंय हे झाडा
शेंदरावाणी, घड आंब्याचा बहरला हा पाडा
दडला हा पानी, न देखीला कोणी
जरा कुरवाळा लावून माया

पुन्हा पुन्हा का, करता खुणा का मिचकावूनी हा डोळा
नव्या थाटाचं, नव पाखरूं, वय औंदा हे सोळा
स्वभाव हा मानी, जोखू नका पाणी
हवी दासीला तुमची छाया

□

# चल नांदाया

क्षण सोन्याचा नको दवडु वाया
आलो साजणे मी तुजला ग न्याया
चल नांदाया नांदाया नांदाया

त्या मुंबापुरीला ग पुरता मी विटलो
ते खावूनी अन्न तब्बेतीनं हटलो
पुरा वीस पौंड वजनाने घटलो
सुदाम्यापरी अशी झाली ग काया

त्या खोल्या नव्हे कोंबडयांचं खुऱ्हाडं
एका एका खोलीत सतरा बिऱ्हाडं
जसं लग्नाला हे जमलंय वऱ्हाड
ना जागा बसाया ना जागा उठाया

ती टंचाई पाण्याची नळावर गर्दी
नळाच्या त्या पाण्याने होते ग सर्दी
त्या सर्दीनं बेजार मुंबई ग अर्धी
ते डॉक्टर बसलेत पोट भराया

महागाईला तर चढली ही मस्ती
कुठलीच वस्तू मिळेना ग सस्ती
म्हणूनी ती सोडून मुंबईची वस्ती
हा जगदिश धजला शेती कराया

□

# झालं बघ झुंजुमुंजु

शेतकऱ्या चल, फुटलं तांबडं
आरवलं कोंबडं
कि झालं बघ झुंजुमुंजु

नेसलीया वनराणी शालु हिरवागार
माणिकमोत्यानं तुझं भरलंय शिवार
मार खांद्यावर बिगी ते घोंगडं

झोंकात हाय गड्या औंदा पिकपाणी
खाशील बसूनी तू उद्या राजावाणी
उठ घे हाती कुदळ फावडं

हा मळा ही विहीर कशाला तुला तोटा
येळ लई झाला आता पाणी सोड पाटा
जुंपून मोटेला बैल ते रांगडं

धान्य हे नव्याचं देवा आधी वाहूं
आनंदे नाचू अन् भल्लरी गाऊं
मोडू जगदिशा दुःखाचं तांगड

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# सोडीले घरदार

सजणा तुजसाठी
आले सोडून मी घरदार
मग का घेशी माघार

गणगोत्रा आईबापा तोडीले
अन् मी तुझ्याशी नाते जोडीले
सर्व सुखावर पाणी सोडीले
तुटला दीन अबलेचा आधार

तन मन नाथा तुला वाहीले
फक्त आशेवर तुझ्या राहीले
दुःख बहू अन् दोष साहीले
सोशिले जग-निंदेचे प्रहार

राया म्हणशील तशी वागले
आणि दिल्या वचना मी जागले
म्हणून देशोधडी लागले
झाले हे जीवन बेकार

व्यर्थ तुझ्यासाठी मी सुकले
व्यर्थ तुझ्या रे कलाने झुकले
इथेच मी जगदिशा चुकले
दिधला प्रीत मार्गी होकार

□

## नवरा आपुल्या गोमूचा

बाय बाय गो, हाच काय गो
नवरा आपुल्या गोमूचा

गोमू आपली बारीक गो
अंगाने जशी काय खारीक गो
हा तर बाय, जाडा हाय
गेंडा राणीच्या बागेचा

गोमू आपली गोरी गो
मोगऱ्याच्या फुलासारी गो
हा तर बाय, काळा हाय
कयपती चकण्या डोळ्याचा

गोमू आपली ठेंगणी गो
नाजूक भारी देखणी गो
हा तर बाय लंबोडा हाय
भोंगा जैसा गिरणीचा

गोमू तरणी-ताठी गो
जशी आंब्याची बाटी गो
हा तर बाय, नाखवा हाय
म्हातारा अर्ध्या उंम्रीचा

गोमू आपली गुणाची गो
भोळी नेक मनाची गो
हा तर बाय, जगदिश हाय
आळशी मेला गांवाचा

□

# सुवासीन मी झाले

सासरी आले सुवासिन मी झाले
आठवणीचा हा दिवा
जाळीतो माझ्या जिवा

आठवण येते ग आई अवखळ छोटा तो भाई
वाढविले तू, आम्हा ममतेने, गाऊनी अंगाई
तुझीच ही पुण्याई
वडील तैसे मायाळु भारी भेटतील ग केव्हा

निशीदिनी या पाखरा, सांगते जा माहेरा
सांग आईला अन् बापाला दिवाळीच्या सणाला
यावे मला न्यायाला
सासु सासरे धनीही देतील जाया मुभा ग तेव्हा

मिळाले पती गुणवान, वर्णू किती गुण
नणंद लहान, दिसते छान, सासू मातेसमान
राखते त्यांचा मान
जगदिश तो एक, सिद्धीविनायक, करते तयांची सेवा

□

# गिर्रेबाज

सखे बघून गिर्रेबाज
तुझ्या मळ्याचा हिरवा साज
मन हारकलं माझं

बघून नवती उसाभोवती
कोल्हेकुईचा दणका
जगा आगळं–रूप येगळं
बघून ती मेनका
अप्सरा इंद्राची लाजं

माचणा वरती-गोफण फिरती
बघून मन हे रमलंय
सोबत पदरा-सांगतो वारा
नवी नवीनच जमलंय
हे मेथकुट माझं नी तुझं

पंख सखीच्या-पंखा भिडवून
गाई जसा तो बुलबुल
आडोशाला त्या झाडाखाली
बसुन दोघे गुलगुल
करू एकांती ये हितगुज

निंदक आपला-खरा तो जगदिश
जळजळुनी ग मरतोय
म्हणूनिच तो तुझ्या नि माझ्या
नावाने ग करतोय
गांव सारा हा कुजबुज

□

# बाळु माझा मुंबईवाला

बाळु माझा हा मुंबईवाला गा
जसा नटून साहेब आला गा

माझ्या बाळुचं क्यास
जशी गवताची रास
अन् वासाचं तेल डोईला गा

माझ्या बाळुचं खमीस
जशी मेंढयाची भीस
नाही तोटा चित्रा मोराला गा

माझ्या बाळुचं घडचाळ
जशी घोडयाची नाल
वर पट्टा इस्टीलचा त्याला गा

माझ्या बाळुचं बुट
जसं खैराचं खुटं
जपे नायलोनच्या मोजाला गा

तोंडामधी सिगरेट
बोले इंग्रजी थेट
धाव जगदिशा बघायला गा

□

# जीव तुझ्यावरी खुळा

असेना का काळा रंग सावळा
जीव तुझ्यावरी सखे हा खुळा
सडपातळ बांधा, जणू काळी नागीन
नयनी झळके ही काजळी कमान
तुझी ज्वानी आली उफाळून
कपाळी कुंकू गडे दिसते खुलून
केस काळेभोर कुरळे झुलती वाऱ्यानं
शोभे गं तुझं, तुजला झोकात चालणं
मनमोहक ते तुझं गं बोलणं
तुझ्या डौलावर हरपलं भान
थांबीव चाळा, मी गडी भोळा
तु गं उमलती गुलाबाची कळी
तुझं मुख हसरं सदा सर्वकाळी
गुणसंपन्न तू भाबडी ग भोळी
खुल्या दिलाची तू मनमोकळी
तुझं लावण्य गडे मन माझं जाळी
मी सखे चंद्र तुझा, तू माझी चंद्रावळी
का भूल पाडीशी ग हसूनीया गाली
दे मला साथ आज रंगवू दिवाळी
वय तुझं सोळा बहरला मळा
बघताच तुजला खिळली नजर
साक्षात वाटे मज चंद्राची तू कोर
तुला भेटण्या झाले मन अधीर
तूच जोडशील या गरीबाचा संसार
नको ती गोरी-गोमटी अती भयंकर
सुलक्षणी तू ग कुलवंताची पोर
उज्वल कर या जगदिशाचे घर
शुभ लग्न माळा घालू दोघे गळा □

# भिमा आधी कसं न्हाय मेलं

पुढारी हे भिमा आधी कसं न्हाय मेलं

पाडून समाजात फूट, लावली समाजाची वाट
जाळाया आपलं पोट, सांगुन ते खोटं नाटं
भिम कार्याला हो थेट, लावलं कि हो गालबोट
वाढून बेकीचं ताट, पेरीलं अन्नात काटं
ऐकीला गाडून, समाज फोडून
वाटोळं यांनी केलं केलं

माजलं असं हे बंड, ठोकावं कुणीही दंड
वाद-विवाद अखंड, धडधडे अग्नीचा कुंड
हे समाजातले पुंड, काढती समाजाची धिंड
पाडली तटाला खिंड, तरी उंच हे काळतोंड
कार्य ते दिसलं, पुढारी बसलं
करुनी आपलं भलं भलं

लोपला हिरा अन्‌मोल, अन् कथील ते राहीलं
पाडाया जगाला भुलं, उधळाया गुणाची फुलं
ना कार्याचा सुरताल, हे संसारात गुलं
फुंकती घरात हे चुल, अन् बाहेर सेवेची हुल
वेचती गोवऱ्या, जगदिशा हे
जिथं वेचली फुलं फुलं

□

# गाते अंगाई

जो जो रे बाळा—जो जो रे बाळा
अंगाई मी गाते तुजला

अभिषेक बाळा तुझे नांव शोभे तुजला
आनंद होईल आज जाधव कुळाला
तुझ्या गंगाधर पित्याला
अन् स्मिता मातेला
गोंजारिती लाडक्याला

चांदणे हे शीतल थंडगार छाया
तुझी ही नाजुक सुकुमार काया
हातपाय इवले इवले
बाळ तान्हे माझे चिमुकले
झोका देते लडीवाळा

लागेल बाळा तुजला दृष्ट कुणाची
मिठ मोहरी उतरीते बाळा तुझ्यावरती
काजळ लावून डोळा
हाती दिला खुळखुळा
पायी वाजे घुंगूरवाळा

वास करी निद्रादेवी तुझ्या डोळ्यावरती
खेळूनी झोपी गेली मूर्ती ही गोजिरी
गोड गळा आळविता
गीत जगदिशाचे गाता
लागला झणी डोळा □

## धरतीमाता विचारते चंद्राला

धरती ही माझी माता विचारते चंद्राला
सांग बा चंद्रा सांग मानव खरंच का येथे आला

उदंड ऐशी लेकुरे मानव नांव तया हे साजे
आई मी यांची तरी लादले शिरी पापाचे ओझे
काय कथा मग तुझी यापुढे कर विचार मनाला

अनंत ऐसी गुणी ही बाळे हजार त्यांचे चाळे
चाळे बघूनी पांढरे होतील चंद्रा तुझे रे डोळे
लग्न लावूनी जोडीने येतील नभी मधुचंद्राला

जागोजागी घरे बांधतील स्वतःच मालक होतील
टंचाई जर तुला जागेची कसून पागडी घेतील
देव म्हणूनी पुज्य मानतील उडत्या रॉकेटाला

महागाई ती दुप्पट चौपट कसे तुझे रे भागेल
रेशन कार्ड तुझ्या नावाचे तुला काढावे लागेल
जाशील जेथे नंबर तेथे तुझा शेवटून पहिला

कुणी बिचारा होईल वेडा करील धंदा खोटा
तोंड तुझे हे बंद करतील हिरव्यागार नोटा
जगदिशा मग बाई बाटली ऊत तसा मटक्याला

□

# खेळ मदीरेसवे खेळता

खेळ मदीरेसवे खेळता खेळता
डाव बसलो हरुनी मी नशेमध्ये
गेला लौकिक वाया तमाशा असा
काल बसलो करुन मी नशेमध्ये

निंदा मित्रामध्ये, गणगोत्रामध्ये
चार-चौघामध्ये, पत्नी पुत्रामध्ये
मान देईना कुणी बदनाम असा
आज गेलो ठरुनी मी नशेमध्ये

रिते पाकीट पहाता, सकाळी उठून
पाजीली कोणा, कोणा हे ना आठवे
साजरा केला सण, कैकदा हा असा
गेलो नाहक मरुनी मी नशेमध्ये

पैसा आला किती, पैसा गेला किती
ना आयुष्यात केली चुकूनी गिणती
याच हाते उधळली, किती संपत्ती
गल्लीबोळ फिरुनी मी नशेमध्ये

सोड दारु सुटेना, जगदिश वदे
दारु माझ्यामध्ये अन् मी दारुमध्ये
टेकले हात प्याल्याने माझ्यापुढे
गेलो पुरता विरुनी मी नशेमध्ये

□

# दावू नका पैका

दावू नका पैका, हिंमत हाय का
पुढं या पाव्हणं भेताय काय
माल ह्यो इकत घेताय काय

धीर धरा जरासं थांबा
आला भराला हापूस आंबा
सांगते या कानात, एकलच मनात
खुशीत गाजरं खाताय काय

लग्नाचं वय हे आंवदा
सांगा पटतोय का ह्यो सवदा
विन दामाची, भेट प्रेमाची
हे काळीज काढून देताय काय

□

# मग काय करू

पाहता पाहता दैवयोग असा घडला
सखे मग काय करू
अन् नजरेला माझ्या, तुझ्या नजरेचा तीर भिडला
सखे मग काय करू
म्हणशी दिलवरा हाय धीर धरा
पण सखये तुझ्या पायी ग बावरा
जाहलो मी पुरता धुंद
तुझा नाद जडला
सखे मग काय करू
हासता वाटले ना कुणा वावगे
भासले जग नंदनवन अवघे
नव प्रीतीला ऐसा आज
नवा रंग चढला
सखे मग काय करूं
तू भक्तीण माझी मी जोगी तुझा
तुझ्या पायी झुरतो हा रोगी तुझा
मी वेडा तुझा ग
तुझ्या प्रीतीचा रोग जडला
सखे मग काय करू
दे जन्माची ऐसीच जगदिशाला साथ
गंगेपरी तुझ्या गंगेशाला
हाय संतोष रुपा शोधावया
जीव गढला
सखे मग काय करू

□

# चिमणे चिऊ चिऊ

चल ग चिमणे चिऊ चिऊ, गवत बिछाना मऊ मऊ
भर भर काड्या जमवू, घर हे आपण दोघं शिऊ

अमोल देवाघरचा ठेवा
मुबलक रानचा हा रानमेवा
खावून थोडा, पाहून ओढा, पाणी ओढ्याचं पिऊ पिऊ

बहरला हा ऋतु वसंत
कोकीळबाई ना उसंत
बसलीया गात, आंबेवनांत, गित कोकीळा कुहू कुहू

पिकली रानोमाळ शेती
डोलती कणसावरती मोती
आलीया रंगा, चालून गंगा, तोवर हात ये धुवु धुवु

भूर जगदिशादारी जाऊ
घालीता दाणे टिपून खाऊ
खाल्ल्यावरी काय, म्हणू सुसरी बाय, पाठ तुझी लय मऊ मऊ

□

# माझी जोडी खिल्लारी

गाडीवान मी भला गाडी नवी कोरी
चालली रे हाट माझी जोडी खिल्लारी

नाद हा घुंगराचा गळी घुंगूर खुळखुळ वाजं
आसं गुणी बैल माझं नांव ढवळ्या पवळ्या साजं
चाल ऐटबाज डौलदार न्यारी

लई गार मजेदार झोंबे अंगा झुळझुळ वारं
रान तुडवीत हिरवंगार चालली माझी खिल्लारं
हाती फाकड्याच्या कासऱ्याची दोरी

चाक हे गाडीचं नवं गीत कर कर गाई
हे वऱ्हाड लग्नाचं बसल्या गाडीत वरमाई
गंगू अन् रंगू यमु सर कल्लोरी

दटाविता बैला तुटतो तीळ तीळ जीव
धावता गाडी भरधाव ना ठावं आलं कधी गांव
पोचली रे जगदिशा गाडी शिवारी

□

# झाड पैशाचं लावलं

ज्याचं त्याचं हे आयतच फावलं
झाड पैशाचं इथं का लावलं

नाही झालं वरीस लग्नाला अजून
आली सासू गेली महिनाभर राहून
सोंग शिमग्याचं तिनं हे दावलं

आली मेव्हणी ही, मुंबई बघाया
संग नवरोबा घेवून फिराया
जे जे मिळेल ते मटकावलं

गेली मेव्हणी तो आला सासरा काल
नाही पोरी बरं आलो ऐकून हाल
बरं निमित्त त्याला हे घावलं

धाडीयला कागुद मेव्हण्यानं झणी
केली जगदिशा पैशाची मागणी
जसं बापानं कमवून ठेवलं

□

# काळाची नौबत

आज काळाची नौबत झडू लागली
कैसी घटना अजब ही घडू लागली .

पापाच्या भाराने, मुक्या या माराने
आज धरती अशी डळमळु लागली
कोसळु लागले, आज डोंगरकडे
अन् घरावर घरे ही पडू लागली

अवकळा ही खरी त्या स्मशानापरी
दुर्दशा ही अशी कोयनाकाठची
भाऊ गेला कुठे, तर बहीण कुठे
लेकरासाठी आई रडू लागली

घर असूनी बेघर धनदौलत ही तर
लोपली मातीच्या या ढिगाऱ्यामध्ये
ना पुरेसा तो कपडा ना पुरेसे ते अन्न
माणसे अन्नाविन तडफडू लागली

निसर्गाची दरी, कोसळे तुजवरी
सावरुनी तू वेडया रे धरशील किती
ऐक जगदिशा अवधी ना उरला आता
बघ दुनिया तुझी ही बुडू लागली

□

# गाढवाला गुळाची

कथा सात भावांची एका तिळाची
पण चव कुठं कळते गाढवाला गुळाची

भरी खुशाल जो तो इथे आपली झोळी
खुपे कुणाचे भले इथे कुणाच्या डोळी
करुनी स्वार्थासाठी सारे जिवाची होळी
परंतु वाघ इथे सोडूनी आपली जाळी
करील कां किंमत उंदराच्या बिळाची

भरले रंगढंग नाना जगाच्या अंगी
असा हा न्याय मतलबी जगाचा ढोंगी
बळी तो कान पिळी युद्ध खेळे जो अंगी
परंतु घेई प्राण ऐसा हत्तीचा मुंगी
तरी ऐंट हत्तीला आपल्या बळाची

रुसावी राणी आपुली या दासीवर
वसून ऐटीने अज्ञानाच्या राशीवर
खुला जो तो जगदिशा इथं वेशीवर
टांगावया अब्रू दुसऱ्याच्या कुळाची

□

# चुकल्यावरी

कळते माणसाला चूक आपली चुकल्यावरी
जेव्हा तारुण्य याद येते केस आपले पिकल्यावरी

जन्मा येवूनी या जीवनात काय मी केले
सुचतो शहाणपणा डाव पुरता हुकल्यावरी

जगी म्हणतात खरी प्रीत पतंगाची परी
कळते मोल प्रीतीचे जिवास मुकल्यावरी

ठरशील तू जगदिशा कसोटीला पुरा
जगात ठोकरी खावूनी धडा शिकल्यावरी

□

# स्वाभिमान

तूच स्वाभिमान माझा जीव प्राण
तुझ्यामुळे रे माझ्या कुंकवाला मान

पहिलीच तुझीमाझी मांडवात भेट
मांडवात भेट बसली जन्माची गाठ
जन्माची भेट झालं शुभ सावधान

तुझीयाच नांवे हाती भरला हा चुडा
भरला हा चुडा गळी मंगळसूत्र वेढा
मंगळसूत्र वेढा हेच सौख्य माझं जाण

कर्तव्य माझे खरे ब्रिद पतिसेवा
ब्रिद पतिसेवा माझ्या अंतरीच्या देवा
अंतरीच्या देवा माझा तूच पंचप्राण

राहीन मी एकनिष्ठ सांभाळीन मर्जी
सांभाळीन मर्जी त्यात जगदिश राजी
जगदिश राजी त्यांत माझं समाधान

# लाल त्रिकोण

थांबवू ग म्हटलं थांबवू
आता पाळणा पुढे हा लांबवू

लाल त्रिकोणाचं वरदान
छोटं कुटुंब सुखाची खाण
खूण जगाच्या– नव्या युगाच्या
मनावरी बिंबवू

देवू देशाच्या हाकेला हाक
पाळ संततीनियमन चोख
चित्त रमणाची– उपकरणांची
साधने ही जमवू

आहे ठावूक साजणे पक्का
जगदिशा हा उद्याचा धोका
सांगड गीताची– देशहिताची
ललकारी घुमवू

□

# मन कसं मोडू

आठ महिन्याची गर्भार मन कसं मोडू
राणी पैलास मागते बुंदीचा लाडू

रोज हिला नवे नवे
मिठाईचे पुडके हवे
अशी बघते ही
माझं दिवाळं काढू

हिलाच का जगान्यारे
डोहाळपद आलंय बरे
केर घरातला
काढीना घेवून झाडू

पलंगाच्या गादीवरी
बसुनिया संतापरी
बघे आभाळा ही
आभाळा ढिगाळ जोडू

जगदिशा आहे माहित
जगात का बाया नाहीत
या महाराणीला
अमेरिकेला का धाडू

□

# निशीदिन तिळ तिळ

जाळी जिवा या निशीदिन तिळ तिळ
भिमा तुझ्या मिलनाची आस
तुझ्यासाठी हा जीव भोळा
झाला वेडा आणि खुळा
जिव बेचैन लागेना
भिमा डोळ्यास रे डोळा
संपली रे सीमा, तुजविना भिमा
दिनरात मन हे उदास

लावूनीया जिवा माया
कुठे गेलास भिमराया
सोडूनी लेकरा आपुल्या
कसा धजलास रे जाया
कुणा सांग आता, ही माझी मनुष्यव्यथा
आला हा नशिबी वनवास

कसा वियोग हा साहू
कसे ताब्यात मन ठेवू
सांग भिमा आता तुला
कुठे शोधावया जावू
जपतो मी नांवा तुझ्या भिमदेवा
तुझाच मनाला हा ध्यास

नको झाले आता जिणे
तुझ्या पाठीस मज येणे
भासते जगदिशाला ह्या
तुझ्या वाचून जग सुने
सेवक हा मी तुझा, नव्हे कोणी दुजा
तुझीयाच चरणाचा दास

□

२५८९
२५०९३
काल्य २०।८।८८

# सोन्याची खाण

सखे सांग तुला कशाची ग वाण
ही चिली-पिली जणू आपली सोन्याची खाण

दागीनं घ्या लावीशी का ग टुमणं
गोजीरी बाळे हेच तुझं दागिनं
हेच तुझं माझं वेडे सुखसमाधान

हेच खरं वैभव शोभा घराची
जपू धनदौलत हीच मोलाची
करु जोपासना लावून जीवप्राण

निघूनी हा जाईल गरीबीचा काळ
आजउद्या होतील मोठी ही बाळं
शिकवूनी शाळा त्यांना करू विद्वान

ज्ञान अमृताचे घालूनिया न्हावू
जगदिश आपुला समाजाला वाहू
अन् करू आपला समाज बलवान

□

# जिंकीलं पुरुषानं

कुंकु लावता पतीनामाचं
गुपीत कथलं आरशानं
कि जिंकीलं नारीला पुरुषानं हो

ना पतीविना ती सती, ना स्त्री जाती सद्गती
सती अहील्या पावन झाली, रामाच्या पदस्पर्शानं

त्या यज्ञमंडपी धोका, देणारी नीच त्राटीका
राक्षसीण ती ठार मारीली, अयोध्येच्या नरेशानं

कृष्णाचा घ्याया प्राण, ती आली विषाची खाण
दुष्ट अधाशी पुतना मावशी, चित पाडीली कृष्णानं

शुर्पणखा अति चलाख, कापता तियेचे नाक
चीड चीड चीडली (अन्) जळफळली लक्ष्मणावर त्वेषानं

खुणगाठ मनी ही बांध, घे टिपून याची नोंद
दाखला ग हा पुराणातला, सांगितला जगदिशाने

□

## लोकशाही टिकणार नाही

अरीष्ट या हिंदवीचे चूकणार नाही
अशाने ही लोकशाही टिकणार नाही

शाळा अलीगढ तालुक्याची जागा
मॉनिटर वर्गात तो बौद्ध मुलगा
क्रोध तिथें झाला त्या हिन्दूचा जागा
बांधूनी ठार केले त्या छोट्या वाघा
जीव कवडीदामाने विकणार नाही

ही देन निसर्गाने दिली मानवाला
जवानीत मर्दाच्या पीळ तो मिशीला
मनाई का बौद्धा मिश्या राखण्याला
ठार मारण्याची ही धमकी कशाला
भले प्राण देवू पण झुकणार नाही

दृश्य ते विचित्र त्याच जिल्ह्यामधले
विहीरीचे पाणी ना शेतास दिधले
म्हणूनी त्या बौद्धास जिवंत वधले
वैर बौद्ध पत्नीशी बलात्कारे साधले
ते नीच पाप झाकून झाकणार नाही

बड्या बड्या कर्मठ त्या धेंडांची साथ
बौद्ध वस्तीवरती पहा केली मात
मूले, बायका नी म्हातारे घरात
आग लावीली त्यांना कोंडूनी आंत
जग तोंडावरती का थुंकणार नाही

शिरस गांवचा तो भिजे अजून प्रश्न
हिंडावल्या बाजारी बौद्ध स्त्रिया नग्न
तालात तुमच्याच तरी तुम्ही मग्न
घालवा जगदिश राज्यातले विघ्न
जेणे पिक वादाचे पिकणार नाही

□

# घरटचात व्हा एक रे

लेकरे लेकरे सारी भिमाईची लेकरे
चुकली वासरे अन् ही पाखरे
या घरटचात व्हा एक रे

मन आईचे का मोडता का संघटना फोडता
वैर आपसात का जोडता, नाते बंधुत्वाचे तोडता
लेकरे ऽ सोड मीपणाचा झोक रे

खेळ दुहीचा का खेळता मार्गी आडमार्गी का वळता
स्वप्न सुडाचे का घोळता, कुपती असे का लोळता
चोखाळा मार्ग हा चोख रे

पाणी वळवाचे ते वळू नये जर संगम हा जुळू नये
जीव का आईचा जळू नये, तडफडू अन् तळमळू नये
जाणा माऊलीचे दुःख रे

मार्ग ह्याहुनी ना दुसरा, संघशक्तीचा आसरा
दोष जगदिशाचे विसरा, घ्या हाती एकीचा कासरा
हीच माऊली तुझी हाक रे

□

# कुमारी की लगीनवाली

शहाणपण शिकलेल्या
व्यवहारा मुकलेल्या
रिवाजापण चुकलेल्या
तरुणी या बहकलेल्या
ना रंग कुंकवाचा कळे, कुणास तो हल्ली
ही कुमारी आली की, आली लगीनवाली

साडी चोळी लालच, कुंकू ते विशिष्ट
लाल झेंडेकी जय, पुरती कम्युनिष्ट
डाव पुरा हुकलेल्या
लालीपुढे झुकलेल्या

साडी चोळी भगवी, कुंकू तसे भाळी
भासे जणू पुरती, ही शिवसेनावाली
योजना ह्या आखलेल्या
फिरावया सवकलेल्या

साडी चोळी हिरवी, कुंकू हिरवेगार
जशी मुस्लीम लीग, झेंडयातली कोर
पानामध्ये झाकलेल्या
कैऱ्या आता पिकलेल्या

भर निळया वस्त्रात, निळया कुंकवाची
नार जणू आली, रिपब्लीकन पक्षाची
जगदिशा टाकलेल्या
फासामध्ये अडकलेल्या
रिवाजापण चुकलेल्या
तरुणी या बहकलेल्या
ना रंग कुंकवाचा कळे, कुणास तो हल्ली
ही कुमारी आली की, आली लगीनवाली

□

# मुरवत काय कामाची

धरूनी हात वरूनी लाथ
ही मुरवत काय कामाची
करी विश्वासाने हा घात
ही फसगत काय कामाची

पिळूनी त्या गोरगरिबांना, धुळी मिळवी बापुडयांना
अशी ही कमवी हरामाची, ही दौलत काय कामाची

म्हणवी दादा दीना नाडी, आईबहिणींना हा छेडी
अशा या मस्त रेडयाची, ही ताकत काय कामाची

बेअब्रू कुबेराचा छंद, करती पैशाने तोंड बंद
अशा निर्लज्ज धनिकाची, ही इज्जत काय कामाची

गर्व कां रे करशी फुकाचा, भरवसा काय देहाचा
जगदिशा सांग वेडया, तुझी जीत काय कामाची

□

# दलित पँथर

न्याय हवा, अन्याय कैसा आम्ही साहू
जीव जळे जेथे मिळे
न्याय तो ना समांतर
दे टोला हाच मंतर
दे दणादणा दलित पँथर

भर बाजारी केल्या आयाबहीणी नग्न
नराधमा ठेचल्याविना का आम्ही राहू

कैसे म्हणावे तुम्हा जातीवंत
कोंडुनी पोराबाळा जाळले जिवंत
पेटलो जर का आग जगा आम्ही लावू

साठले रक्ताचे हे थारोळे
फोडीले गवईबंधूंचे डोळे
डोळे हे उघडे ठेवूनी कसे आम्ही पाहू

म्हणून पावती स्फुरण हे हात
जगदिशा झाली जातीवर मात
जीव देवू आम्ही अथवा भले जीव घेवू

□

# भिमरायाचा मळा

जोवर भाळी कुंकवाचा
चमकत राहील टिळा
फुलविन भिमरायाचा मळा

तन मन वाहीन जनतेसाठी
पाऊल हे माझे तुमच्या पाठी
लेक जरी मी– कुलवंताची
लावीन दीना लळा

उरला जरी हा तनु सांगाडा
संसाराचा मी हाकीन गाडा
थापथापता शेंणी अशा मी
सोशीन उन्हाच्या झळा

पंढरपूर ते जळो सुवर्णी
स्वर्ग हा माझ्या तुमच्या चरणी
पोत कशी ही दिसते काळी
शोभूनी माझ्या गळा

कैसे जगावे जिणे पशूचे
नांव नको त्या जगदिशाचे
घाव घणाचे घालता उठती
अंतरयामी कळा

□

# मटका

जिवा ज्याच्या त्याच्या दिनरात चुटका
शिरजोर झाला या दुनियेत मटका

लोपली ती संत महंताची वाणी
वाहे गल्लोबोळात मटक्याचे पाणी
मटक्याच्या नादात मदीरेचा घुटका
जिथे तिथे वेडचा खिशाला हा फटका

कुणी लावी छक्का कुणी लावी पंज्या
धुंद ओढणारा तो चिलमीत गांजा
गांज्याच्या नादात घडी अन् घटका
उडे छक्क्या-पंजात सटाडूंचा खटका

ना साहेब शिपाई न कारकून खाली
बघा ज्याच्या त्याच्या ही हातामध्ये डेली
विद्यार्थ्याच्या खिशात मास्टर मटका
मजुरालाही याच वेडाचा झटका

रंगल्या या नादात बुवा अन् बाया
जगदिशा गेलास तू पण वाया
डोहाळे भिकेचे हे करुनी घे सुटका
ठेव मानपानाचा शाबूत हा पटका

□

# पुरावा देतो ऐका

पुरावा देतो जरा ऐका
निर्दय पुरुषाहुनी बायका

बहीण उमाजी नायकाची सख्खी
पकडूनी दिले उमाजीला नक्की
घेवून सायेबाकडून पैका

करणारी ' अ ' चा मा आनंदीबाई
रक्त स्वतःच्या पुतण्याचे प्येई
लाज जिवाला तिच्या हाय का

आजचा जमाना तरी कुठं नेक
माऊली बाळाच्या गळयाला देई नख
तरी ही मन तीचं भरलंय का

स्त्री जात वेडी अशी जगदिश
पाजीते बायको नवऱ्याला विष
सांग काय दुनियेत ऱ्हायलं का

□

## खुदकन् जरा

उद्या घेईन ग सजणें तुला चंद्रहार
सोड रुसवा हा नाही बरा
ग हास गालात खुदकन जरा

फुलु दे प्रीतीचा गडे बाग हा
किती नाकावर तुझ्या राग हा
किती सांगू समजावू मी शिकवू तुला
ऐक माझ्या गलाबाच्या सुंदर फुला
उद्या बोनसचा माझ्या मिळू दे पगार
देतो इसार त्या सोनारा

संसार आपुला ग सजणे नवा
जेव्हा येईल जन्मा वंशाचा दिवा
तुला सोन्यात पुरती मी मढवीन ग
दागदागीनं नवं नवं घडवीन ग
धनी मी हा असा ग तुझा दिलदार
नाच आनंदाच्या तू भरा

नाही कशी तुजला नांवाची कदर
ना जगदिशाच्या जिवाची कदर
जिवा टोचेल ऐसे तू बोलू नको
बोल मोलाचे माझे हे तोलू नको
वागण्याने तुझ्या हा केला कहर
हट्ट करतो तुझा मी पुरा

□

# मुंबई ग नांव

नव्हं ग माझ्या साळू हा डोंगराळी गांव
शोभतं शहराला या मुंबई ग नांव

हजार तऱ्हेची ही हजार दुकानं
मुंबई नगरी ही पैशाची खाण
नको मागं पाहू– आधी पल्याड जावू
लई रस्त्याला धावत्याती गाड्या भरधाव

चल बस आली ग माहीमला जावू
जोडीनं ग सर्कस ती जेमिनी पाहू
पाणघोड्याचं ग काय, त्यात गोरीला बी हाय
नवी नवलाई माकडाचं बघू हावभाव

दुकान हे कसलं नको ग मला पुसू
चल बिघी दोघं या स्टुडीयोत घुसू
नोट दहाची मोडू– फोटू जोडीनं काढू
बस शेजारी सखे तुला कुणाचं ग भ्याव

साळु चल आता ग जाऊ हॉटेलात
हॉटेलात बंद त्या फॅमिली रुमात
खाऊ मुर्गी प्लेट– नको भिऊ थेट
आहे खंबीर हा मालक जगदिश राव

□

## मूर्ती गौतमाची ठाई ठाई वसे

राञ हो मध्यांनी, निद्रेत शयनी, यशोधरा राणी
कौतुक हसे, नित हृदयी वसे
मूर्ती गौतमाची ठाई ठाई वसे...

रंगली स्वप्नी गौतमा ध्यानी
म्हणे गौतमाची मी पट्टराणी
भरीते घरी मम वैभव पाणी
उणे काय मजला गडे मम जीवनी
लाभला गुणी, जिवलग धनी, अमृतवाणी जिव्हारी ठसे...

लाजवी रुपडे जणू मदना
ऐसा रूप राजा गौतम राणा
गडे याच माझ्या सौख्याच्या खुणा
सौंगडी ऐसा लाभला जीवना
हाच कंठमणी, आज मी कोरुनी, जिवात भरुनी ठेवीला असे

गोजीरवाणा नवा पाहुणा
खेळतो अंगी राहुल तान्हा
प्रतिबींब दुजे गौतमाचे जाणा
वंश कुलदीप हा दिपवी नयना
मूर्ती गौतमाची ठाई ठाई दिसे...

पण काय ठावे तिला भोळीला
गौतम जाईल याच घटकेला
त्यागुन राज्य सुख वैभवाला
कशी आवरील ती शोकसागराला
जगदिशा ज्ञणी, उठताच क्षणी, दचके मनी, हे घडले कसे

□

# रामाचं राज

ऐक रे दादा, हो ऐक रे राज्या
हे सरकार ऽऽ मायबाप माझं
करी जनता या राज्यात रामाचं राज

मायबापाची लाडाची लेक महागाई
ती हो नांदायला सासरी जातच नाही
तिला बसायला लुचपतिचा लाल घोडा

तिला हौस सोन्यानाण्याची
पोत गळ्यात काळ्या मण्यांची
खोड वाईट आयतं खाण्याची
हिंडे नगरात सोडूनी रितरिवाज

इथं धनिकांचा ऽऽ रुबाब मोठा
त्यांच्या खिशामंधी उडती टणाटण नोटा
त्यांना मागे पुढे लागती नोकरचाकर
इथं गरीबाला मिळेना चटणीभाकर

पहा जावून त्यांच्या विभागा
त्यांच्या हवेलीसमोर बागा
नाही गरीबा न्हायाला जागा
नाही पांघरूण झाकावया नीट लाज

मायबापाचा हो कुळदेव हा पैसा
पुजा रात्रीची अन् चालते ही भरदिवसा
मिळे पोरींना सायासावाचून धंदा
पोरी भिडविती पोरांच्या खांद्याला खांदा

बसे पोरींच्या खांद्याचा गचका
छान होई बेकारांचा पचका
करी काम हे अमुलचा मस्का
हाच बेंडबाज्या जगदिशा इथं वाजं

□

# ये रे देवराया

नवीन ही दुनिया एकदा बघाया
ये रे देवराया, ये रे देवराया

पाहुनी या इथल्या पुढाऱ्यांचे रूप
चढेल रे देवा तुलाही हुरुप
पांढरी खादीची टोपी वापराया

व्यापारीवर्ग हा धरूनी उराशी
ठेवून जनतेला खुशाल उपाशी
काळचा बाजाराचा साठा कराया

जनरक्षणाची केवळ ही थट्टा
बांधून कमरेला तो सरकारी पट्टा
मागच्या हाताने हप्ता रोज घ्याया

धनप्राप्तीसाठी खेळूनिया मटका
जगदिशासंगे बसूनी दो घटका
नवसागराची नवटाक घ्याया

□

# जमान्याची हवा

जगावे कैसे आली पाळी जीव देण्याची
हवा बिघडली खरी मैतरा जमान्याची

मिळेना नोकरी वाढली ही बेकारी
वशीलेबाजी श्रीमंताघरीच पाणी भरी
गरिबाघरी आज मौत खाण्याची

सुटता हे रेशनकार्डाचे जगी वारे
रिकामी झाली जणू सारी धान्य कोठारे
आणि भरली घरे खचून शेटवाण्यांची

धोबीघाट जणू रोज धनिकांची धुणी
इथे मिळेना गरिबांस प्यावया पाणी
नळात भांडणे रोज रोज पाण्याची

पोरी एकीचढ एक चार चार घरी
चुकून मागणे एखादे फिरेना दारी
अहो राखावी कशी लाज मग घराण्याची

मिळेना जागा भरमसाठ मागती पागडी
हुकूम येथला हा गोर-गरीबा रगडी
बंदी सडकेवर जगदिशा रहाण्याची

□

## पोळपाट लाटणं

पुरं झालं नटणं अन् तुझं फटफटणं
जा कर काम आपलं घे पोळपाट लाटणं

आदळाआपट एवढी कशापायी
तुला लुगडं चोळी का घेणार नाही
कर स्वयंपाकाची बीगी बीगी घाई
साखरपुडा आज सरज्याचा हाई
सोडून दे ताटणं, चल आवर झाडलोटणं

कारभारीण तू कैसी ग खुळी
हट्टाला पेटलीस भलत्याच वेळी
लावून काखेला हट्टाची झोळी
फिरशील लोक ग हसतील सगळी
वागणं हे कुठलं, तुझं माझं नाही पटणं

करीन सगळं मी ठायठीक
जा कामाला लाग बिनधोक
सरज्या आपुला एकुलता एक
तुझा नी माझा लाडका लेक
त्याच्या सुखासाठी, कर्तव्य माझं झटणं

चिंता जिवाला तुझ्या कशाला
आहे काळजी ह्या जगदिशाला
सांगतो देवून पिळ मिश्याना
देईन औताण गावो गांवाला
मी माझ्या वंशासाठणं करीन पाय पिटणं

□

# डाव मांडीला पत्त्यांचा

डाव हा पत्त्यांचा मांडीला आता खेळ नरा

एक्का म्हणजे एक मान पहिला परमेश्वरा
दुरी म्हणजे दोन चंद्र सूर्याचा फेरा
तीरी म्हणजे त्रिगुण ऐक शाहीरा
चौका म्हणजे चार वेद चाळ ग्रंथ जरा

सांगतो तऱ्हा पुढे यांत आहे का शंका
पंजा म्हणजे पंचतत्वाचा फिरे पंखा
छक्का म्हणजे मोज सहा शास्त्राच्या अंका
सत्ता म्हणजे सत्य सत्याचा जंगी डंका
अठ्ठा म्हणजे राम आठव्या कृष्ण अवतारा

नव्वा म्हणजे नऊ ग्रह पुरावा ताजा
दस्सा म्हणजे दशदिशा फाकल्या तेजा
गुलाम नारद हुशार कळीच्या नाजा
जोडपे नर नारी म्हणजे राणी अन् राजा
इतिहास पत्त्याचा ऐक जगदिशा पुरा

□

# जावईबुवा सुभेदार

आई माऊली फजीत पावली, नार गळ्यातील हार
सासुच्या जिवावर जावईबुवा सुभेदार

वाढवूनी नवमास दिधला जन्म जिनं
म्हणूनी सांगा केला काही गुन्हा तिनं
केला जिनं लहानाचा मोठा, तीच घराच्या बाहेर

बसे दिसाच्या दिसं धरूनी सासुचे दार
मर्द असुनी खाई अबलेपुढती हार
नाही दिले सासुने तर मग समजा बेडा पार

असुनी धंदा धंद्यावरती लक्ष नसे
आयतंखाऊ हा आयतं खाऊन घरी बसे
थु असल्यावर जिण्यावरती मग जिणं असलं बेकार

सोडशील का आता तरी आपुल्या खोड्या
बैस चुलीपासूनी दूर बाईलवेड्या
उठ जगदिशा आता तरी तू जीवन आपुले सुधार

□

## बोले पैसा छनाछन

चाले हंसाची चाल, बोले पैसा छनाछन बोल
फिरे पैश्याभोवती दुनिया ही गोल
गत ऐका पैशाची न्यारी
हिंडतो पैसा हा दिशा चारी
जीव देतात या पैशावरी
म्हणून शेजारी अन् पाजारी
नजर इष्टमित्रांची न्यारी
भाऊबंद ते नकली बाजारी
मुंगळे जैसे हे गुळावरी
ऐसे लाखो हरीचे लाल

सगे अन् सोयरे ते नवलाख
करु पहातील लाखाची खाक
मिळाली त्यांना जर नवटाक
मारतील प्रेमाने मग ते हाक
मलई मिळता वर्णीतील झोक
ना तर मुरडतील पाहुनी नाक
पितील फुकूंनी बळे ताक
असे लोभी हे पैशाचे लोक
वसरे पैशापुढे तोल

घडे सारेच हे पैशापाई
बाप पैसा अन् पैसा आई
पैशासाठी कुणी जीव देई
जीव कोणाचा तो कोणी घेई
दुश्मनी नित्य पैशाच्या ठाई
कदर भावाची भावाला नाही
खुळखुळे पैसा हा ज्या ज्या ठाई
तिथें ही बाटली आणि बाई
वागे जगदिश बेताल □

# गौतमा तुझी चाकरी

लागली जन्माची आता नोकरी
करीन गौतमा मी तुझी चाकरी ..

भिम नोकरी मज लावून गेले
चरणी तुझ्या मज ठेवून गेले
आलो इथे आजपरी, आज परि खरोखरी
खात खात जन्मभरी ठोकरी....

धूळ तव पदाची होवून देवा
करीन रात्रंदिन तुझीच सेवा
दयाघना ऽ मग मिळो ना मिळो
पोटाला पोटभर भाकरी....

वस्त्र ते भगवे साजे तुजला
शस्त्र दे तसे दुजे तू मजला
नको नवे परि हवे– परि हवे ते भगवे
नको तलम भरजरी वा लोकरी ...

धनलालसेची ना मज आशा
पुरवी मनाची हीच मनिषा
जगदिशा यावे मरण यावे मरण जगदिशा
गाता गाता गुण तुझे आखरी....

□

# झाकली मूठ

तोबा तोबा समक्ष ही घटना
ना घडणारी घडलेली आहे
नाही किंमत उरली मुठीला
झाकली मूठ आज उघडलेली आहे

शिष्य गुरुचा राखीतो मान
नाते गुरुचे वडीलासमान
असता बाईल जिवंत गुरुच्या
पोर गळयात ही पडलेली आहे

उष्टयावीण कावळया ना गत्यंतर
किती घारीच्या भरारीत अंतर
ना बुडावी परी या घारीची
चोच नरकात बुडालेली आहे

पाणी निर्मळ सोडून पिण्याचे
झाड पाहुनी छोटे चण्याचे
सर सर शेंड्यावरती चढूनी
खाली धपकन ही पडलेली आहे

नोहे नोहे पदरची ही भाषा
सत्य असते कटु जगदिशा
नोक तलवारीची काळजाच्या
देठाला आज भिडलेली आहे

□

# राव थांबा की जरा

राव थांबा की जरा थोडं म्हटलं
सांगा नांव कोण गांव तुम्ही कुठलं

दिसता पुढारी मोठं भलं
वजनानं तुमच्या धरती हालं
सावशीद बोला जपुनी बोल
नाहीतर घसराल जाईल तोल
घोडं समाजाचं जर सुटलं

करा जे कराल आम्ही राजी
पण आपसात तुमची नाराजी
मोडता जनतेची मरजी
करता अशी का दगलबाजी
बिंग आता सारं बघा फुटलं

वागणं असलं नव्हं चांगलं
नुसतं कुकुल्या परी रांगलं
असतं चहुकडं हे पांगलं
तुम्हीच येशीवरी टांगलं
गटबाजीचं हे खटलं

सोडा हा गटबाजीचा कावा
खवळल जनता सावध व्हा
त्या जगदिशा परी दिवा
लावू नको वं पुढारी बुवा
राखा इमान जरा म्हटलं

□

# चंदनासवेच विरघळला

रचली चिता चंदनाची
पेटता सुगंध दरवळला
झोपला त्यात भिमराया
चंदनासवेच विरघळला

घालती थैमान या लाटा
शहारे अंगावर काटा
अखेर दर्याकिनारी
दीनांचा सूर्य मावळला

डाग तो काळजास निखारा
गळती वाळूत अश्रूधारा
पाहून शोक जनतेचा
तो सागरही हळहळला

वाहती लोट धुराचे
अहो त्या महापुरुषाचे
झाकले तोंड तारकांनी
ढगाआड चंद्र कळवळला

भडकल्या ज्वाला भयानक
झाली जळोनिया राख
पाहता प्रसंग तो डोळा
हाय जगदिश तळमळला

□

# पवित्र धरती

ही पवित्र धरती
सोनं उधळी, उधळी माणिक मोती
गर्भात भूमिच्या, लाखो निपजली, रत्ने लाखमोलाची
संत चोखोबा, आणि तुकोबा, समर्थ वचने समर्थांची
भजने मीरेची, आणि जनीची, ज्ञानेश्वरी ज्ञानेशाची
कबीर गाथा कबिराची अन्, पंचशीला ती बुद्धाची
कलाकृती ही, कर्तृत्वाची देई मानवा स्फुर्ती

तो स्वातंत्र्यवेडा, मायभूमिचा, आद्यपुरुष तो शिवाजी
पुत्रा आधी ते, लग्न गडाचे, वदणारा वीर तानाजी
खिंडीत करुनी, कोंडी वैऱ्याची, घाव झेलणारा बाजी
न्यायसिंहासन, रामशास्त्र्याचे, अन्याया पाणी पाजी
शिक्षा राघोबा, देहांताची, निर्भिड तो न्यायमूर्ती

ती झाशीवाली राणी लक्ष्मी, देशास्तव कामी आली
त्या वासुदेव बलवंताने तर, मानही फासावर दिली
क्रांतीवीर त्या, भगतसिंगाने, होळी जीवनाची केली
चेंदामेंदा त्या, बाबू गेनूच्या, देहाचा मोटारखाली
दिपवी डोळे, जगताचे ती, नेताजीची किर्ती

तो माणुसकीचा, महान सेवक, मान आधी ज्योतीबांना
शिल्पकर्थेचा, तो मुख नायक, डॉक्टर आंबेडकर जाणा
महात्मा गांधी, आणि जवाहर यांच्यापुढे झुकती माना
लाल बहादूर, लहान जरी ते, हात पोहचविले गगना
ओवाळीतो जगदिशा ही, पंचप्राणांची आरती

□

REFBK-0025713

REFBK-0025713

“ या देशासाठी रणभूमीवर
प्राण जयांनी वाहीला
महाराष्ट्राच्या शुर वीरांनो
तुंम्हालाच पहिला
घ्या मानाचा मुजरा
घ्या मानाचा मुजरा ”



**शाहीर अमर शेख**

गायिका: **विठाबाई भाऊमांग नारायणगांवकर**

“ जसा रुपवान गुणी दिलदार
तसा लढवय्या शुर सरदार
ग बाई मला हवा असा भरतार ”

“ बाळू माझा हा मुंबई वाला गा
जसा नटूनी साहेब आला गा
माझ्या बाळूच खमीस
जशी मेंढ्याची भीस
नाही तोटा चित्रा मोराला गा ”

गायक: **तुकाराम दणाणे/चिंतामण तांबे**



“ जीव गेले किती मोजू नंतर
जीवद्यांना हवे या नामांतर
जिद्द ही विद्यापिठापुरती
पण त्या मराठवाड्यावरती
नांव झळकू द्या
भिमराव आंबेडकर ”

गायक: **गोविंद म्हशीलकर**

---

**कवी: जगदीश जाधव**